# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक २३१) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार, दि.१३ सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## राज्यात १५ सप्टेंबरपासून पावसाचा जोर वाढणार, गणपतीत जोरदार पावसाची शक्यता

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- यंदा राज्यात सरासरीपेक्षा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला होता. त्यातच आता सप्टेंबरचा पहिला आठवडा संपला तरी पावसाचा पत्ता नाही. पावसाळ्याचे तीन महिने सरले, पण राज्याच्या अनेक भागांमध्ये पावसाने अपेक्षित हजेरी लावली नाही. विशेषतः मराठवाडा, विदर्भ, सोलापूरसह राज्यातील अनेक भागांवर दुष्काळाचे गंभीर सावट निर्माण झालंय. त्यातच ऑगस्टपासून पावसाने दिलेली मोठी ओढ आता शेतकऱ्यांच्या काळजावर घाव घालू लागलीय. सोयाबीन, कापूस, मका, बाजरीसह ज्या पिकांवर शेतकऱ्याचं वर्षभराचं गणित अवलंबून असतं. तीच पिकं आता पाण्याअभावी माना टाकू लागली आहेत. तर दुसरीकडे परिस्थिती इतकी गंभीर आहे की मोठ्या जलाशयांमधील पाणीसाठाही चिंताजनक पातळीवर पोहोचलीय. अशातच आता हवामान विभागाने पावसासंदर्भात मोठा इशारा दिला आहे. महाराष्ट्रात मान्सूनचा परतीचा प्रवास अद्याप सुरू झालेला नसून पुढील चार दिवस राज्यातील अनेक भागांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार राज्यातील बहुतांश भागात ११ ते १४ सप्टेंबरदरम्यान पावसाची शक्यता आहे. तर विविध जिल्ह्यांसाठी पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर १५ सप्टेंबरपासून पावसाचा जोर वाढणार असून मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, पुणे, नाशिक, मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत मेघगर्जनेसह पाऊस, विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्याचा अंदाज आहे.

# मनोज जरांगेंचा एल्गार, १५ सप्टेंबरला मुंबईकडे कूच करणार

## मराठा आरक्षणासाठी १९ सप्टेंबरपासून आझाद मैदानावर बेमुदत उपोषणाची घोषणा!

जालना दि.१२ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून महाराष्ट्रातील राजकीय आणि सामाजिक वातावरण चांगलेच तापले आहे. अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांचे गेल्या १४ दिवसांपासून सुरू असलेल्या बेमुदत उपोषणावर अद्याप कोणताही तोडगा निघालेला नाही. या पार्श्वभूमीवर आज, १२ सप्टेंबर रोजी दुपारी समर्थकांची एक महत्त्वाची बैठक पार पडली आहे. या बैठकीत जरांगे पाटील यांनी आपल्या आंदोलनाची पुढील दिशा स्पष्ट करत मुंबईत धडक देण्याची अधिकृत घोषणा केली आहे. या राज्यव्यापी बैठकीत त्यांनी मुंबईला जाण्याचा सविस्तर मार्ग, मुक्काम आणि आंदोलनाची संपूर्ण रणनीती जाहीर केली. ''ही मराठ्यांची अंतिम आणि निर्णायक लढाई असून, आपण शांततेच्या मार्गाने मुंबईत जाऊन जिंकूनच माघारी येणार आहोत,'' असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.



बैठकीत उपस्थितांना संबोधित करताना जरांगे पाटील यांनी राज्य सरकारवर घणाघाती टीका केली. ''नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही,'' असा इशारा देत त्यांनी स्पष्ट केले की आता आंदोलकांची पावले मुंबईच्या दिशेने पडतील. सरकारकडून ठोस पावले उचलली जात नसल्याने अखेर मुंबई गाठण्याशिवाय पर्याय उरलेला नाही, असे त्यांनी नमूद केले.

मनोज जरांगे यांनी यापूर्वीच १२ तारखेनंतर मुंबईला जाण्याचा इशारा दिला होता. आजच्या बैठकीत त्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. सगेसोयरे अध्यादेशाची अमलबजावणी आणि मराठा आरक्षणाच्या सर्व मागण्या पूर्णपणे मान्य झाल्याशिवाय माघार घेणार नाही, या भूमिकेवर जरांगे पाटील ठाम आहेत. जालना येथील अंतरवली सराटीतून सुरू होणारा हा मोर्चा पाटोदा, श्रीगोंदा, हडपसर (पुणे) आणि खोपोली येथे चार मुक्काम करत पाचव्या दिवशी मुंबईच्या आझाद मैदानात शांततापूर्ण मार्गाने धडकणार आहे.

आपण ज्या मार्गानं जाणार आहे त्या मार्गावर म्हणजेच अंतरवाली-शहागड- गेवराई -बीड-मांजरसुभा-लिंबा गणेश मार्गे पाटोदा या रस्त्यावरुन जे मराठा बांधव मुंबईसाठी चाललेत ते मराठा समाजाच्या अस्तित्वासाठी चालले आहेत. आम्ही ज्या रस्त्यावरुन मुंबईला चाललोय, त्या मार्गावर जे मुंबईला येणार नाहीत त्यांनी आशीर्वाद द्यायला, वाटेला लावण्यासाठी यावं. समाजासाठी एक दिवस काढून आम्हाला आशीर्वाद देऊन माघारी घरी जावं. जी तारीख सांगणारे त्या तारखेला रस्त्यावर या. जी तारीख सांगितली त्या तारखेला काम बंद, नोकरी व्यवसाय बंद, तुमच्या अंगात मराठ्यांचं रक्त खेळतंय असं वागा. चिखलानं पाय भरले असले तरी शेतातून पळत या, आम्ही चाललेल्या मार्गावर आपल्या मुंबईला जाणाऱ्या लेकराला आशीर्वाद द्यायला रस्त्यावर या, असं आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केलं.

जे नोकरदार, व्यावसायिक आणि शेतकरी मुंबईला येऊ शकत नाहीत, त्यांनी आंदोलकांच्या मार्गावर सहकुटुंब उभे राहून त्यांना आशीर्वाद द्यावा आणि मुंबईला जाण्यासाठी निरोप द्यावा. तसेच, ज्यांच्याकडे चारचाकी गाड्या आहेत, त्यांनी आंदोलकांना मुंबईच्या वेशीपर्यंत सोडून माघारी यावे. ''तुमचे काही हजार रुपयांचे डिझेल समाजाच्या लेकरांचे आयुष्य घडवेल,'' अशी भावनिक साद त्यांनी घातली.

सर्व वाहनांनी एकाच रांगेत चालायचे असून एकमेकांना ओव्हरटेक करायचे नाही. सोबत केवळ पीठ, भाकरी, अंथरूण-पांघरुण घ्यायचे आहे; काठ्या किंवा कोणतीही शस्त्रे अजिबात घ्यायची नाहीत. ''न्यायदेवतेवर आपला विश्वास आहे, त्यामुळे न्यायदेवतेचा सन्मान राखण्यासाठी आंदोलन अत्यंत शांततेत करायचे आहे. कोणीही दगडफेक किंवा जाळपोळ करायची नाही,'' अशी सक्त ताकीद त्यांनी दिली.

वाटेत पोलिसांनी बॅरिकेड्स लावून रस्ता अडवल्यास ते ढकलायचे नाहीत. त्याऐवजी थेट डांबरी रस्त्यावर ठाण मांडून बसायचे आणि पोलिसांना हात जोडून जाण्याची विनंती करायची. ''देवेंद्र फडणवीस पोलिसांना मराठ्यांना अडवायला सांगणार नाहीत, कारण त्यांना मराठ्यांच्या रोषाची आणि मतांच्या ताकदीची जाणीव आहे,'' असा दावाही जरांगे यांनी केला.

हैदराबाद गॅझेट आणि शपथपत्राच्या आधारावर कुणबी प्रमाणपत्र दिले जाणार नाही, या चर्चेवर जरांगे यांनी संताप व्यक्त केला. ५८ लाख नोंदी सापडूनही प्रमाणपत्रे वाटली न गेल्याने शासनाने सुरू केलेल्या कॅम्पमधून मराठ्यांना शपथपत्रावर प्रमाणपत्रे मिळालीच पाहिजेत, अशी मागणी त्यांनी केली. ''पश्चिम महाराष्ट्र सदन (श्रीमंत) असला तरी ते आपलेच भाऊ आहेत, त्यांच्याशी कटुता ठेवायची नाही. आपण मराठवाड्यात कोरडे असलो तरी हे आंदोलन यशस्वी झाल्यावर मी स्वतः जायकवाडीच्या भिंतीवर बसून मराठवाड्यातील प्रत्येक गावाला पाणी मिळवून देईन,'' असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### असा असेल मोर्चाचा मार्ग

- ✻ १५ सप्टेंबर : अंतरवाली सराटी ते पाटोदा (जि. बीड)
- ✻ १६ सप्टेंबर : पाटोदा ते श्रीगोंदा (जि. अहिल्यानगर)
- ✻ १७ सप्टेंबर : श्रीगोंदा ते हडपसर (पुणे)
- ✻ १८ सप्टेंबर : हडपसर ते खोपोली (रायगड)
- ✻ १९ सप्टेंबर : सकाळी १० वाजता मुंबईतील आझाद मैदानात प्रवेश आणि आमरण उपोषणास सुरुवात.

### मनोज जरांगेंच्या १४ पैकी १२ मागण्या पूर्ण, एक दोन मागण्या कायद्याच्या चौकटीत अडकल्या, सरकारची चर्चेची तयारी-प्रवीण दरेकर

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी १९ सप्टेंबरपासून मुंबईच्या आझाद मैदानात आमरण उपोषण सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. मनोज जरांगे यांच्या या निर्णयावर महायुतीमधून पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू नेते प्रवीण दरेकर यांनी भूमिका मांडली आहे.

प्रवीण दरेकर म्हणाले की मराठा समाजाचे प्रश्न महत्त्वाचे आहेत. मराठा समाज राज्यातील मोठा समाज असून विषय गंभीर आहे. या दृष्टीने सरकारने पूर्ण सहकार्य आणि चर्चा या संदर्भात केली आणि अनेक मंत्री तथा नेते त्या ठिकाणी गेले. १४ पैकी बारा मागण्या पूर्ण झाल्या आहेत, एक दोन मागण्या कायद्याच्या चौकटीत अडकलेल्या आहेत, त्यातून मार्ग काढण्याचा सरकारचा प्रामाणिक प्रयत्न आहे. यामुळे सरकारने पूर्ण चर्चा केली आणखी चर्चेची तयारी आहे त्यांना नेमकं आणखी काय हवंय जे जे हवंय ते देण्याचा प्रयत्न सरकारने केला आहे जे मागितलं ते समाजाचे उत्कर्षासाठी केला आहे, असं दरेकर यांनी स्पष्ट केलं.

देवेंद्र फडणवीस यांनी जेवढे मराठा समाजासाठी सरकार म्हणून केलं तेवढं कुठल्याही सरकारच्या काळामध्ये झालेलं नाही. एकनाथ शिंदे असतील अजित पवार असतील सुनेत्रा वहिनी असतील या सर्व सरकारचे नेते प्रमुख या मागण्या संदर्भात समाजासोबत आहेत. सरकारची चर्चा करण्याची अजूनही तयारी आहे, असं प्रवीण दरेकर म्हणाले.

तुम्हाला दौरे हवेत की प्रश्न सुटायला हवेत ? तुमच्याकडे कोण येते, यापेक्षा सरकार दखल घेताय की नाही हे महत्त्वाचे आहे. राधाकृष्ण विखे पाटील, उदय सामंत, प्रसाद लाड हे सर्वजण या ठिकाणी आले होते मनोज जरांगे यांना भेटले होते. कोणी यावं, कुणी जावं यापेक्षा प्रश्नांची सोडवणूक होणे महत्त्वाचे. सरकारने प्रश्नांची सोडवणूक केली आहे, असं दरेकर यांनी स्पष्ट केलं.

## ब्रिक्सच्या १८ व्या समिटमध्ये दिल्ली जाहीरनामा एकमताने मंजूर

### युद्ध आणि संघर्ष टाळण्यासाठी प्रयत्नांची गरज आणि एकतर्फी टॅरिफबाबत चिंता, १० प्रस्ताव मंजूर

नवी दिल्ली दि.१२ (वृत्तसंस्था)- ब्रिक्स शिखर परिषदेच्या समारोप सत्रात दिल्ली घोषणा २०२६ ला एकमताने मंजुरी देण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सदस्य देशांसमोर घोषणेचा मसुदा सादर केला आणि कोणत्याही देशाला काही आक्षेप आहे का, असे विचारले. कोणत्याही सदस्य देशाने आक्षेप न घेतल्याने, ही घोषणा एकमताने स्वीकारण्यात आली. घोषणेमध्ये ब्रिक्सची भविष्यातील दिशा आणि जागतिक व प्रादेशिक मुद्द्यांवर सदस्य देशांची सामायिक भूमिका स्पष्ट केली. मोदी म्हणाले की, ही घोषणा शिखर परिषदेदरम्यान झालेल्या चर्चेचे सार आणि ब्रिक्स सहकार्य पुढे नेण्यासाठीचे प्राधान्यक्रम दर्शवते. आपल्या समारोप भाषणात मोदी म्हणाले की, ब्रिक्स देशांमध्ये विविध मुद्द्यांवर मतांतर असले तरी, सहकार्यासाठीची सामायिक वचनबद्धता स्पष्टपणे दिसून येते. ते म्हणाले की, जग वेगाने बदलत आहे आणि जुन्या संस्था या बदलत्या जगाला सांभाळू शकत नाहीत. मोदींनी जागतिक संस्थांमधील प्रतिनिधित्व, उत्तरदायित्व आणि नियम-निर्मिती प्रक्रियेत सुधारणा करण्याच्या गरजेवर भर दिला. ते म्हणाले की, बदलत्या जागतिक गरजांनुसार या संस्थांमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.

दिल्ली जाहीरनाम्यात, ब्रिक्स देशांनी युद्ध आणि संघर्ष टाळण्याच्या प्रयत्नांवर भर दिला आणि विवादांच्या मूळ कारणांवर लक्ष देणे आवश्यक असल्याचे म्हटले. सदस्य देशांनी संवाद, सल्लामसलत आणि मुत्सद्देगिरीद्वारे आंतरराष्ट्रीय विवादांच्या शांततापूर्ण निराकरणासाठी आपली वचनबद्धता पुन्हा व्यक्त केली. त्यांनी जागतिक समस्यांसाठी बहुपक्षीय दृष्टिकोनाचे आवाहन केले, जो प्रत्येक देशाच्या राष्ट्रीय दृष्टिकोनांचा आणि भूमिकांचा आदर करतो. या जाहीरनाम्यात एकतर्फी शुल्क आणि अशुलकीय उपाययोजनांच्या वाढत्या वापरावर गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली. ब्रिक्स देशांनी म्हटले की अशा उपाययोजनांचा जागतिक व्यापारावर परिणाम होतो आणि त्या डब्ल्यूटीओच्या नियमांशी विसंगत आहेत.



अणुबॉम्बच्या धमक्या आणि अणुबॉम्ब संघर्षाच्या वाढत्या धोक्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. ब्रिक्स देशांनी सीमापार देयके सुलभ करण्यासाठी संवाद सुरू ठेवण्याची आणि व्यावहारिक उपाय शोधण्याची गरज असल्याचे सांगितले आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या एकतर्फी सक्तीच्या उपाययोजनांचाही निषेध केला. जागतिक व्यापार, पुरवठा साखळी आणि ऊर्जेचा सुरळीत प्रवाह कायम राखण्यासाठी ब्रिक्स देशांनी एकत्र काम करण्याच्या गरजेवरही संयुक्त घोषणेत भर देण्यात आला.

## मनोज जरांगेंनी गणेशोत्सवात मुंबईला आंदोलन करु नये-चंद्रशेखर बावनकुळे

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- सध्याच्या घडीला मनोज जरांगे पाटील हे काय करतात किंवा त्यांच्या भूमिकेपेक्षा राज्यातील दुष्काळाच्या परिस्थितीचा मुद्दा महत्त्वाचा असल्याचे मत राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले. महाराष्ट्रातील १८ जिल्ह्यांमध्ये थोडा कमी पाऊस आहे. पीक करपत आहे. काल सर्व जिल्हाधिकाऱ्यांची मी बैठक घेतली. आज चार वाजता पुन्हा सर्व जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. ते शनिवारी नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

मुंबईमधील आंदोलन म्हणजे मुंबईकरांसाठी कायदा सुव्यवस्था संदर्भात कठीण आहे. याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने दिलेले निर्णय पाहता मुंबईत कायदा सुव्यवस्थेची परिस्थिती निर्माण होऊ नये याची सर्वांनी काळजी घेतली पाहिजे. राज्यातील सर्व आंदोलकांना विनंती राहील की, या काळात मुंबईत आंदोलन करणे राज्याच्या दृष्टीने योग्य नाही. ओबीसी किंवा मराठा समाज असेल कोणाचाही हक्क डावलता येणार नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे या दोघांनी मराठा समाजाच्या मागण्या पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे. इतिहासात कधी न घेणारे निर्णय देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी घेतले तरीही या दोन्ही नेत्यावर करण्यात येणारी टिप्पणी महाराष्ट्राला आणि समाजाला पटत नाही. आजवर मराठा समाजाला दिलेला न्याय हा देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्या काळात मिळाला आहे. आमचा सरकार मराठा समाजाला न्याय देण्याच्या भूमिकेत काम करत आहे. त्यामुळे सरकारला थोडं वेळ दिला गेला पाहिजे. मुंबई किंवा महाराष्ट्रात गणेश उत्सव हा देशातील सर्वात मोठा सण आहे. या काळात कोणी आंदोलन करू नये, असे आवाहन चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. राज्यातील शेतकऱ्यांना दुष्काळ काळात कशी मदत आणि त्यांच्या पाठीशी उभे राहता येईल, आणि शेतकरी आत्महत्या करणार नाही हे महत्त्वाची बाब आपल्यासमोर आहे. राज्याच्या दुष्काळाकडे जाणीवपूर्वक लक्ष टाकण्याच्या मुख्यमंत्र्यांनी मला सूचना दिल्यात आजची बैठक त्यासाठीच होती. कॅबिनेटमध्ये मुख्यमंत्र्यांनी मला आणि चीफ सेक्रेटरी ना सर्व राज्याचे तातडीने सर्वेक्षण सुरू करण्याचं सूचना केले आहे. जिल्ह्यात काय उपाययोजना करता येईल यासाठी मुख्यमंत्र्यांनी सूचना केल्या आहे. आणि जी नियमावली आहे त्यानुसार आम्ही शेतकऱ्यांना मदत करण्याच्या भूमिकेत आहोत.

## गणेश मंडळांकडून प्रसाद अन् अन्नदानासाठी एफडीए नोंदणी बंधनकारक

पुणे दि.१२ (प्रतिनिधी)- गणेश मंडळांकडून प्रसाद आणि अन्नदानासाठी एफडीए नोंदणी बंधनकारक करण्यात आली आहे. प्रसाद आणि अन्नवाटप सुरक्षित व स्वच्छ ठेवण्यासाठी एफडीएकडून नवी नियमावली जारी करण्यात आली आहे. अन्नदान करणाऱ्या गणेश मंडळांना अन्न व औषध प्रशासनाकडे नोंदणी करणे आवश्यक असणार आहे. नोंदणी १२ महिने, तीन महिने किंवा गणेशोत्सवाच्या दहा दिवसांसाठी घेता येणार आहे. तीन महिने आणि दहा दिवसांच्या नोंदणीसाठी १०० रुपये शुल्क असणार आहे. गणेशोत्सव काळात प्रसाद आणि महाप्रसादाच्या दर्जाची एफडीएकडून प्रत्यक्ष पाहणी केली जाणर आहे. अन्न तयार करताना अस्वच्छता किंवा घाणीचे प्रकार आढळल्यास एफडीएकडून कारवाई केली जाणार आहे. एफडीएच्या विशेष पथकांकडून दहा दिवस गणेश मंडळांच्या अन्नवाटपावर बारकाईने लक्ष ठेवलं जाणार आहे.

गणेशोत्सव काळात गणेश मंडळांकडून वाटप केला जाणारा प्रसाद आणि अन्न संपूर्णपणे स्वच्छ व सुरक्षित असावा, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने नवी नियमावली जाहीर केली आहे. या नियमावलीनुसार अन्नदान व प्रसादवाटप करणाऱ्या प्रत्येक गणेश मंडळाला एफडीए कडे नोंदणी करणे सक्तीचे करण्यात आले आहे. मात्र, ही नोंदणी नेमकी कोणी करावी, प्रक्रिया काय आहे आणि याचे निकष काय आहेत, यांबाबत मंडळांमध्ये अजूनही संभ्रमाचे वातावरण आहे.

## मनोज जरांगेंच्या मुंबई आंदोलनावर अजय बारसकरांची सडकून टीका

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा मुंबईच्या दिशेने आंदोलनासाठी निघाले असताना त्यांच्यावर टीकेची धारही वाढली आहे. मराठा आरक्षणाचे अभ्यासक अजय बारसकर यांनी जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या भूमिकेवर आणि मुंबईकडे जाण्याच्या निर्णयावर जोरदार हल्लाबोल केला आहे. जरांगे यांनी मुंबईला जाण्याचा मार्ग बदलण्यामागे आंदोलनाला मिळणारा प्रतिसाद कमी झाल्याचे कारण असल्याचा दावा बारसकर यांनी केला. तसेच जरांगे यांच्या आंदोलनाच्या पद्धतीवर, त्यांच्या मागण्यांवर आणि आर्थिक व्यवहारांवरही त्यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत.

बारसकर यांनी जरांगे पाटील यांच्यावर अत्यंत बोचऱ्या शब्दांत टीका करत त्यांच्यावर ''चालबाज'', ''बंडलबाज'' आणि ''भंपक'' असल्याचा आरोप केला. तसेच जरांगे यांच्या आंदोलनात नाट्यमयता असल्याचे म्हणत त्यांनी त्यांची तुलना अभिनयाशी केली. ''कधी जोश, कधी हसवणं, कधी रडवणं'', अशा शब्दांत बारसकर यांनी जरांगे यांच्या आंदोलनाच्या शैलीवर निशाणा साधला.

मनोज जरांगे पाटील यांच्या पत्रकार परिषदांमध्ये लोकांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले जात असल्याचा संदर्भ देत अजय बारसकर यांनी त्यांच्यावर टीका केली. त्यांच्या मते, यापूर्वी जरांगे यांच्या आंदोलनाला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत होता. लोक स्वतःहून आंदोलनात सहभागी होत होते. मात्र, आता परिस्थिती बदलली असून लोकांना आंदोलनासाठी आवाहन करण्याची वेळ जरांगे यांच्यावर आली आहे, असा दावा त्यांनी केला.

बारसकर म्हणाले की, पूर्वी जरांगे यांचा मोठा दरारा होता आणि लोक त्यांच्या एका आवाहनावर एकत्र येत होते. मात्र आता परिस्थिती बदलली आहे. जरांगे यांच्या भूमिकेतील विसंगती लोकांच्या लक्षात आल्याचा दावा करत त्यांनी त्यांच्या आंदोलनाच्या प्रभावावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. मनोज जरांगे पाटील यांच्या यंदाच्या मुंबई आंदोलनाच्या मार्गात बदल करण्यात आल्याचा मुद्दा अजय बारसकर यांनी उपस्थित केला. पूर्वी ज्या मार्गाने आंदोलन मुंबईच्या दिशेने गेले होते, त्या मार्गावर यावेळी अपेक्षित गर्दी होणार नसल्याची माहिती जरांगे यांना मिळाली. त्यामुळे त्यांनी मार्ग बदलल्याचा दावा बारसकर यांनी केला. ''आधी ज्या मार्गाने गेले, त्या मार्गावर आता लोक येणार नाहीत, हे त्यांना कळले आहे. त्यामुळे मार्ग बदलला,'' असा दावा त्यांनी केला. जरांगे पाटील यापूर्वीही मुंबईच्या दिशेने आंदोलन घेऊन गेले होते. मात्र, त्यातून नेमकं काय साध्य झालं, असा सवाल बारसकर यांनी उपस्थित केला. ''तीन वेळा मुंबईकडे गेलो, काय मिळालं?'' असा प्रश्न त्यांनी विचारला. विशेष म्हणजे, जरांगे पाटील नेमक्या कोणत्या उद्देशाने मुंबईला जात आहेत आणि त्यांच्या आंदोलनातून कोणती मागणी पूर्ण करून घ्यायची आहे, हे स्पष्टपणे सांगितले जात नसल्याचेही बारसकर यांनी म्हटले.

## 'लष्कर-ए-तोयबा'शी संबंधित एकास महाबळेश्वरमध्ये अटक, पाकिस्तानशी संबंध उघडकीस

सातारा दि.१२ (प्रतिनिधी)- मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील एका अनधिकृत मशिदीच्या पाडकामावेळी या कारवाईस पाठिंबा देणाऱ्या व्यक्तीस धमकी प्रकरणाचा तपास करताना महाबळेश्वर तालुक्यातील पाचगणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून एकाचे थेट पाकिस्तानशी संबंध उघडकीस आले आहेत. मोहम्मद शफीक मोहम्मद अकबर लोन (वय ३९, रा. महाबळेश्वर) असे संबंधिताचे नाव असून त्यास मुंबई गुन्हे शाखेच्या गुन्हे गुप्तचर पथकाने शनिवारी अटक केली आहे. त्याचे पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादी संघटना 'लष्कर-ए-तोयबा'शी संबंध असल्याचे पोलिसांनी सांगितले.

मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील एक अनधिकृत मशीद नुकतीच पाडण्यात आली. या कारवाईस प्रसिद्ध व्यावसायिक इम्तियाज खत्री यांनी पाठिंबा दर्शवला होता. यानंतर खत्री यांना २१ मे पासून आंतरराष्ट्रीय क्रमांकांवरून सातत्याने धमक्या येत होत्या. याबाबत त्यांनी २२ जून रोजी पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीचा तपास करताना वरील प्रकार उघडीस आला आहे. पोलिसांच्या या तपासादरम्यान संशयित आरोपी शफीकची अत्यंत संवेदनशील दहशतवादी पार्श्वभूमी समोर आली आहे. त्याचे वडील आणि दोन मोठे भाऊ सध्या पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील मुझफ्फराबाद येथे वास्तव्यास आहेत. त्याचा एक भाऊ २०१९ मध्ये पाकिस्तानात गेला असून, तो 'लष्कर-ए-तोयबा' या प्रतिबंधित दहशतवादी संघटनेत कमांडर पदावर कार्यरत असल्याची माहितीदेखील या तपासात पुढे आली आहे.

## पीक परिस्थितीचा अहवाल सादर करा- महसूल मंत्री बावनकुळे यांचे निर्देश

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- मराठवाड्यातील सर्व जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी, तहसिलदार यांनी पीक परिस्थितीची पाहणी करुन सोमवारी अहवाल सादर करावा,असे निर्देश राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज यंत्रणेला दिले. श्री. बावनकुळे यांनी दुरदृष्यप्रणालीद्वारे आज आढावा घेतला.

विभागीय आयुक्त जी.श्रीकांत तसेच छत्रपती संभाजीनगर विभागातील आठही जिल्ह्याचे जिल्हाधिकारी या आढावा बैठकीत सहभागी झाले होते.

गेल्या अनेक दिवसांपासून पावसाने ओढ दिली आहे. त्यापार्श्वभुमिवर शेतकऱ्यांची पीक पाण्याची तसेच पशुधनाच्या चाऱ्याची नेमकी स्थिती काय आहे, याबाबत वस्तूनिष्ठ माहिती येत्या दोन दिवसात सादर करावी. त्यासाठी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतांवर जाऊन पाहणी करावी. पीक स्थितीचा आढावा घ्यावा,असे निर्देश त्यांनी दिले.

यावेळी छत्रपती संभाजीनगर विभागाची माहिती सादर करण्यात आली की, विभागात सरासरी पर्जन्यमानाच्या ५७ .७८ टक्के पाऊस झाला आहे.मागील वर्षी याच तारखेपर्यंत १०६.३८ टक्के पर्जन्यमान नोंदविण्यात आले होते. मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील पर्जन्यमान याप्रमाणे- छत्रपती संभाजीनगर-८२.३६ टक्के, जालना-८०.०४ टक्के, नांदेड-७४.२३ टक्के, हिंगोली-७०.०८ टक्के, बीड-६४.०५ टक्के, धाराशिव-६२.७३ टक्के, परभणी-५५.३४ टक्के आणि लातूर-५२.१८ टक्के. विभागात एकूण ४९६ मंडळे असून सर्वाधिक २१८ मंडळे हे मध्यम (५० ते ७५ टक्के) पावसाच्या श्रेणीत आहेत.

विभागातील प्रकल्पांमध्ये मोठ्या ११ प्रकल्पात ६६.७४ टक्के जलसाठा असून मध्यम प्रकल्प ७६ असून त्यात २१.३४ टक्के तर लघु प्रकल्प ७८० असून त्यात २०.४८ टक्के जलसाठा आहे.

विभागात सरासरी ९३ टक्के क्षेत्रावर खरीपाची पेरणी झाली आहे. विभागात असलेल्या ५५.६६ लक्ष जनावरांसाठी १ कोटी ०७ मे.टन चारा साठा उपलब्ध आहे. पावसाचा खंड दि.२३ ऑगस्ट ते ११ सप्टेंबर हा दीर्घ म्हणजेच २० दिवसांचा खंड आहे. येत्या दोन दिवसांत पाहणी करून अहवाल सादर करावा,असे निर्देश महसूल मंत्री बावनकुळे यांनी यावेळी दिले.

## कृषी विभागाचा आकृतीबंध अखेर रद्द; कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांची घोषणा

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- तब्बल १७ वर्षानंतर तयार करण्यात आलेला कृषी विभागाचा आकृतीबंध अधिकारी आणि कर्मचारी संघटनेच्या प्रखर विरोधानंतर रद्द करण्यात आला. पुढील मंगळवारी होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांच्या संमतीने मंजूर झालेला आकृतीबंध अधिकृतपणे रद्द करण्यात येईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. मंजूर झालेला आकृतीबंध तांत्रिक प्रवर्गावर अन्याय करणारा, शेतीच्या बांधावरील मनुष्यबळ कमी करून आस्थापना शाखेला बळ देणारा, आस्थापना शाखेला अतिरिक्त मनुष्यबळ पुरवणारा असल्याचा आरोप करून महाराष्ट्र राज्य कृषी सेवा महासंघाने आकृतीबंधाला कडाडून विरोध केला होता. आकृतीबंधाच्या विरोधात पुण्यात धरणे आंदोलन, उपोषण उपोषण सुरू होते. मागील मंगळवारी मंत्रालयात आकृतीबंध संबंधित सर्व कर्मचारी संघटनांची बैठक घेण्यात आली. पण कर्मचाऱ्यांच्या बैठकीत मागण्यांवर एकमत होऊ शकले नाही, तसेच कर्मचाऱ्यांच्या मागण्यांमध्ये एक वाक्यता नसल्यामुळे आणि मागण्या एकमेकांच्या विरोधात गेल्यामुळे बैठक निष्फळ ठरली होती. त्यामुळे प्रस्तावित आकृतीबंध रद्द करण्यात यावा. अतांत्रिक आकृतीबंध तयार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि आकृतीबंध नव्याने तयार करण्यासाठी सर्वसमावेशक समिती निर्माण करण्यात यावी, अशी मागणी महासंघाने केले होती.

## इराण युद्ध लवकरच संपणार, तेलाच्या किमतीत मोठी घसरण होणार, डोनाल्ड ट्रम्प यांचा दावा

वॉशिंग्टन दि.१२ (वृत्तसंस्था)- अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणविरोधातील युद्ध लवकरच संपुष्टात येणार असल्याची घोषणा केली आहे. भारतात १८ व्या ब्रिक्स शिखर परिषदेनिमित्त रशिया, चीन, इराणचे राष्ट्रप्रमुख भारतात आलेले असताना ट्रम्प यांनी ही घोषणा केल्यामुळे त्याचे महत्त्व वाढले आहे. पश्चिम आशियातील संघर्षाचा फटका संपूर्ण जगाला बसत असल्याचा मुद्दा चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांनी आज मांडला होता. ब्रिक्स परिषदेत याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली होती.

नोव्हेंबर महिन्यात अमेरिकेत मध्यावधी निवडणुका होत आहेत. इराण युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किंमती वाढल्या आहेत. त्यामुळे इतर क्षेत्रांनाही त्याचा फटका बसत आहे. डोनाल्ड ट्रम्प हे आयर्लंडच्या दौऱ्यावर आहेत डब्लीन येथील पत्रकार परिषदेत त्यांना इराण युद्ध कधी संपुष्टात येणार? असा प्रश्न विचारला गेला. त्यावर ते म्हणाले, ''मला वाटते लवकरच युद्धाची समाप्ती होईल. मध्यावधी निवडणुकीनंतर लगेचच युद्ध संपू शकते.''

''मध्यावधी निवडणुकीत गुंतागुंत निर्माण करण्यासाठी त्यांच्याकडून शक्य तितका वेळ काढण्याचा प्रयत्न होत आहे. पण मला वाटते लोकांनाही याची जाणीव झाली आहे. जेव्हा केव्हा युद्ध संपेल तेव्हा कच्च्या तेलाच्या किमती खाली येतील'', असेही डोनाल्ड ट्रम्प म्हणाले.

इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान हे ब्रिक्स परिषदेनिमित्त भारतात आलेले आहेत. त्यांनी शनिवारी मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांच्याबरोबर झालेल्या बैठकीदरम्यान म्हटले की, अमेरिकेने पश्चिम आशियामध्ये प्रादेशिक पोलीस असल्याची भूमिका बजावू नये. या प्रदेशाची प्रादेशिक अखंडता आणि सुरक्षा केवळ त्यातील घटक, तेथील देशांद्वारेच सुनिश्चित केली जाऊ शकते.

''इराणला युद्ध आणि सततचा संघर्ष नको आहे'', असे सांगून पेझेश्कियान यांनी शांततेचे आवाहन केले. आमच्या लोकांवर झालेल्या सर्व अन्यायानंतरही आम्हाला युद्ध नको आहे आणि ते पुढे चालू राहावे असेही आम्हाला वाटत नाही. शांततेला आमचे प्राधान्य आहे, असेही ते म्हणाले.

# श्रीगणेश-लोकदैवत

'लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव सुरु केला... ' हे वाक्य वाचता-ऐकताच आपले डोळे आंधळे होतात, कान आपले काम बंद करतात. कारण आपले पुढील विवेचन पाठ असते. टिळकांच्या उत्सवाचा स्वातंत्र्योत्तर काही वर्षे मेळे, व्याख्याने या निमित्ताने संदर्भ होता. नंतर गेल्या ७० वर्षात उत्सवाचे स्वरुप इतके बदलत गेले की, टिळकांनी सुरु केलेल्या त्या घटनेला फक्त ऐतिहासिक व पारंपरिक महत्त्व उरले आहे आणि त्या उल्लेखाने स्फुरण वगैरे येण्याचे दिवस संपून गेले. किंबहुना, गणेशोत्सवाचा गेल्या शंभर-एकशे दहा वर्षाचा इतिहास, त्याचे पुण्यातले व गावोगावचे स्वरुप, त्यात सुधारणा शक्य आहे का याच्या चर्चा हे सारे गणेशोत्सव होत नसेल एवढ्या धुमधडाक्याने आणि कर्मकांडाने दरवर्षी घडत असते आणि त्यामुळे कोणीच ते गांभीर्याने घेत नाही. दुसरीकडे प्रत्यक्षात उत्सव हळूहळू वेगळे स्वरुप घेत आहे. ती प्रक्रिया कोणत्याही लोकव्यवहरात नियमीत होत असते. भले, गणेश ही विद्येची व संरक्षणाची आद्यदेवता असल्याचा उद्घोष जयंत साळगावकर आणि मंडळी करत असू देत; प्रत्यक्षात, समाजातील लोकांच्या लाखो विविध आकाराप्रकारांनुसार गणेशपूजेच्या नाना प्रथा तयार होत आहेत. प्रत्येक समाजगट आपल्या पद्धतीने त्यात भर घालतो आहे वा वजा करतो आहे. वैयक्तीक पातळीवरही गणेशाचे आवाहन सखोल आहे. अत्यंत बौद्धिक पातळीवर गणेश प्रतिष्ठापना व मंत्रपूजा यांचे महत्त्व जपणारी अनेक मंडळी या वैदिक देवतेचा आदर करत असतात. त्याच वेळी, आमजनांतल्या शेवटच्या माणसाला भिडत, महाराष्ट्राच्या सीमा पार करत हे दैवत साऱ्या देशात लोकप्रिय होऊ घातले आहे. श्रीगणेश हे लोकदैवत बनून गेले आहे. आता, अथर्व ऋषींचे मंत्र लोकशक्तीचा कोणता साक्षात्कार कोणत्या टप्प्यावर घडवतात हा औत्सुक्याचा भाग आहे. गणेशोत्सव आजपासून सुरु होत आहे. गणेशोत्सव हे एकात्मता आणि भक्तीचे प्रतीक असते. गणेशोत्सवाच्या माध्यमातून परिसरातील जनता एकत्र येऊन राष्ट्रीय एकात्मतेची भावना जनतेच्या मनात बिंबवली गेली पाहिजे. हा यामागचा उद्देश आहे. परंतु विगत २ दशकापासून गणेशोत्सवाचे स्वरुप बदलत आहे. खरे तर जनतेला गणेशोत्सवाचा अर्थच कळला नाही, असे म्हटल्यास ते वावगे ठरु नये. गणेश आगमनापासून ते गणेश विसर्जनापर्यंत होणारा अनाठायी खर्च, मोठ्या प्रमाणात होणारे ध्वनीप्रदूषण इतर बाबींमुळे गणेशोत्सवाचे स्वरुप बदलत आहे. गणेशोत्सवादरम्यान संत महंतांची प्रवचने, व्याख्याने व्हावीत. जेणेकरुन जनतेत सद्विचार आणि भक्तीची मुल्ये कोरली जातील आणि हेच यामागे अभिप्रेत आहे म्हणून आता पुन्हा टिळकांच्या गणेशोत्सवाचा श्रीगणेशा विचारातील व्हावा, असे वाटते.

## गणांचा-ईश म्हणजेच गणपती!

गणेश शब्दाचा अर्थ गणांचा- ईश वा प्रभू असा आहे. गण म्हणजे शिव व पार्वतीचे सेवक होय. गणांचा अधिपती म्हणून गणपती असेही नाव या देवतेस आहे. महाराष्ट्रात हे नाव विशेष लोकप्रिय आहे. विनायक हे नाव दक्षिणेत वापरतात. हे नाव 'गणपती' नावाशी संबंधित आहे. विनायक-शब्दाचा अर्थ वि म्हणजे विशिष्टरूपाने जो नायक (नेता) आहे तो. याच अर्थाने गणाधिपती नावही प्रचारित आहे. हेरंब नाव देशीय प्राकृत शब्द हेरिम्बो पासून आले आहे. हेरंब म्हणजे दीनजनांचा तारणकर्ता होय.

वक्रतुण्ड, एकदंत, महोदय, गजानन, विकट आणि लंबोदर ही गणपतीची देहविशेष दर्शविणारी नावे आहेत. वक्रतुण्ड म्हणजे ज्याचे तुण्ड (तोंड) वक्र वा वाकडे आहे तो. गणपतीच्या सोंडेमुळे चेहरा थोडासा वक्र दिसतो त्यामुळे हे नाव. एकदंत म्हणजे ज्याला एक दात आहे तो. गणपतीस एक दात असण्याच्या अनेक पौराणिक कथा सांगतल्या जातात. प्रथम कथेनुसार, परशुरामाने युद्धात गणपतीचा एक दात उपटला. दुसऱ्या कथेनुसार कैलास पर्वतावर गणपतीने रावणास अडवले म्हणून रावणाने गणपतीचा एक दाताचे उत्पाटन केले. आणखी एका कथेनुसार खेळाखेळातील लढाईत कार्तिकेयाने गणपतीचा एक दात भग्न केला. महोदर आणि लम्बोदर शब्दांचा अर्थ अनुक्रमे महा म्हणजे मोठे उदर (पोट) असणारा व लंब वा लांबडे उदर (पोट) असणारा असा आहे. ही दोन्ही नावे गणपतीचे स्थूलत्व दाखवतात. विघ्नराज वा विघ्नेश्वर शब्दाचा अर्थ सकल विघ्न वा बाधांचा अधिपती असा आहे. पुराणात सर्वत्र गणपतीचा विघ्नाधिपती म्हणून उल्लेख आढळतो. सकल बाधांचा एकच्छत्र अधिपती व नियंत्रक असल्यामुळे गणपतीस हे नाम प्राप्त झाले.

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव काळाची गरज

**गणेशोत्सव** हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि सार्वजनिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांना एकत्र आणण्याचे कार्य केले. महाराष्ट्र शासनाने १४ ऑगस्ट २०२५ रोजी गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव'म्हणून घोषीत केल्यामुळे या उत्सवाचा उत्साह द्विगुणीत झाला आहे. परंतू हा उत्सव साजरा करताना नागरिकांची सुरक्षितता, कायद्याचे पालन, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक बांधिलकी जपणे आवश्यक आहे. आपल्या आनंदामुळे नागरिकांना त्रास होऊ नये, यासाठी भक्तिभाव कायम ठेवून शिस्तबद्ध रीतीने आणि सामाजिक भान जपून पर्यावरणपूरक पद्धतीने गणेशोत्सव साजरा करणे काळाची गरज आहे.. !

राज्य महोत्सवातून पर्यावरण पूरक गणेशोत्सवाचा संदेश- राज्य शासनाने गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केल्यानंतर यंदाच्या वर्षी हा उत्सव अधिक व्यापक, नियोजनबद्ध आणि लोकसहभागातून साजरा होण्यासाठी सर्व शासकीय विभाग प्रयत्नशील आहेत. महाराष्ट्राची समृद्ध लोककला, लोकपरंपरा आणि सांस्कृतिक वैभव राज्याच्या सीमेपलीकडे पोहोचवण्यासाठी राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने 'लोककलेतील श्री गणेश' आणि 'महा गणेशोत्सव - महाराष्ट्राचा राज्य उत्सव' अंतर्गत देशातील विविध शहरांमध्ये विशेष सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. चेन्नई, सिल्वासा, कोलकाता आणि हैदराबाद मध्ये हे कार्यक्रम होणार आहेत.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने राज्यातील विविध कला, संस्कृती आणि लोकपरंपरांना चालना देणारे कार्यक्रम, शाडूच्या मूर्ती तयार करणाऱ्या कलाकारांना प्रोत्साहन, 'इको-फ्रेंडली गणेश मूर्ती रंगरंगोटी महोत्सव, हातकागद कला संवर्धन, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी कार्यक्रम, हस्तकला प्रदर्शन, सामाजिक जनजागृती आणि विशेष उपक्रम राबवण्यात येत आहेत.

भव्य महा गणेशमूर्ती कार्यशाळा - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात' मधून पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले. हा संदेश व्यापक स्वरुपात पोहोचविण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातर्फे नवी मुंबईत 'पर्यावरणपूरक महा गणेशमूर्ती कार्यशाळा' घेण्यात आली. १० हजारांहून अधिक शालेय विद्यार्थी आणि नागरिकांनी एकाच वेळी पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार केल्या.



मातीच्या मूर्तींना प्राधान्य- पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी राज्यभर व्यापक जनजागृतीवर भर देण्यात येत आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शाडू माती किंवा नैसर्गिक मातीच्या गणेशमूर्तींना नागरिकांनी प्राधान्य देणे आवश्यक आहे. मूर्ती विसर्जनासोबत निर्माल्य संकलन, कचरा व्यवस्थापन आणि मंडप परिसराची स्वच्छतेकडेही गांभीर्याने पाहावे लागेल. जलस्रोतांचे संवर्धन - नदी, तलाव आणि अन्य जलस्रोतांचे प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनाच्या वतीने मूर्ती संकलन व 'मूर्तीदान'उपक्रम राज्यभर राबवण्यात येतो. या उपक्रमाला नागरिकांनी आणि गणेशोत्सव मंडळांनी सहकार्य करायला हवे. घरगुती मूर्तींचे विसर्जन घरच्या घरी किंवा कृत्रिम तलाव, कुंड अशा पर्यायी व्यवस्थेत करणे पर्यावरणाच्या दृष्टीने उपयुक्त आहे. भक्तिभाव कायम ठेवून जलस्रोतांचे संरक्षण करण्याचा संदेश या माध्यमातून देता येईल.

**डीजेमुक्त उत्सव साजरा करुन संस्कृतीचा गजर करुया-** यंदाच्या गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील विविध भागांत डीजे आणि लेझरमुक्त उत्सवासाठी प्रशासनाबरोबरच नागरिकांकडून सकारात्मक भूमिका घेतली जात आहे. मर्यादेपेक्षा अधिक तीव्रतेच्या आवाजामुळे, लहान बालके, गरोदर माता, ज्येष्ठ नागरिक आणि हृदयविकाराच्या रुग्णांना धोका पोहचल्याची अनेक उदाहरणे आहेत. आपल्या आनंदामुळे नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी ध्वनी मर्यादेचे पालन करणे गरजेचे आहे. पारंपरिक ढोल-ताशा, लेझीम, झांज पथक, पोवाडे, शिवकालीन कला, लोकनृत्य आणि विविध लोककलांच्या सादरीकरणावर भर दिल्यास लोककला जपल्या जातील. तसेच स्थानिक लोककलाकारांना रोजगाराची संधी मिळवून देण्याचे सत्कार्य घडेल. यामुळे 'तीव्र आवाज टाळूया.. संस्कृतीचा गजर करुया' ही गणेशोत्सवाला ओळख देता येईल.

लेझरमुक्त गणेशोत्सव - अतितीव्र लेझरच्या प्रकाशामुळे अनेकांच्या डोळ्यांना इजा पोहचली आहे, तर काहींना डोळे गमवावे लागले आहेत. त्यामुळे आकर्षक रोषणाई करताना नागरिकांच्या सुरक्षिततेचा विचार करणे अत्यावश्यक आहे. लेझरचा वापर टाळून सुरक्षित प्रकाशयोजनेला प्राधान्य द्यावे. यंदा डीजेसोबत लेझर लाईटच्या वापराबाबतही प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात आल्या आहेत. उत्सवातील आकर्षण वाढवताना नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होणार नाही, याची दक्षता घेणे प्रत्येक मंडळाची जबाबदारी आहे.

गणेशोत्सवातून सामाजिक संदेशाची प्रभावी मांडणी - गणेशोत्सव मंडळे ही समाजप्रबोधनाची प्रभावी माध्यमे आहेत. शासकीय योजनांची माहिती, रक्तदान, आरोग्य तपासणी, स्वच्छता, वृक्षारोपण, महिला व बालसुरक्षा, व्यसनमुक्ती आणि वाहतूक शिस्त यांसारख्या विषयांवर आधारित संदेश जास्तीत जास्त मंडळांनी देखाव्यांच्या माध्यमातून नागरिकांपर्यंत पोहचवावा. 'माझा गणपती - माझी सामाजिक जबाबदारी' हा विचार प्रत्येक मंडळाकडून पोहोचवता येईल.

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची लोकचळवळ - राज्यातील महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी नियोजन आणि जनजागृतीला चालना देण्यात येत आहे. 'एक गाव, एक गणपती'सारख्या विधायक संकल्पनांसोबत घरगुती गणेशमूर्तींसाठी माती, धातू, संगमरवर किंवा अन्य पर्यायी मूर्तींचा विचार, कृत्रिम विसर्जन स्थळांचा वापर, मूर्ती व निर्माल्य संकलन आणि योग्य व्यवस्थापन याबाबत गावपातळीवर प्रबोधन करण्यात येत आहे. आशा, अंगणवाडी सेविका, शिक्षक, विद्यार्थी आणि ग्रामपंचायत यांचा लोकसहभाग या उपक्रमाला व्यापक स्वरुप देत आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची प्रभावी तयारी - कोल्हापूर जिल्हा परिषदेमार्फत साधारणपणे सन २०१५ पासून पर्यावरणपूरक गणेशोत्सव उपक्रम राबविण्यात येत आहे. नागरिकांचा वाढता प्रतिसाद लक्षात घेऊन यंदाही उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील कुटुंबे आणि गणेशोत्सव मंडळांनी मूर्तीदान, निर्माल्य संकलन आणि जलप्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तालुकानिहाय संपर्क अधिकारी नियुक्त करून गटविकास अधिकाऱ्यांच्या समन्वयाने संनियंत्रण व मार्गदर्शन करण्यात येत आहे. सन २०२५ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात २ लाख ९१ हजार ३१९ घरगुती तर २ हजार ४१० सार्वजनिक गणेशमुर्ती अशा एकूण २ लाख ९३ हजार ७२९ गणेशमूर्तींचे संकलन करण्यात आले. यासोबतच ३८५ घंटागाड्या आणि १ हजार ३५२ ट्रॉलीद्वारे निर्माल्य संकलन करण्यात आले आहे. यंदाही पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी कोल्हापूरकर सज्ज आहेत.

युवकांनी उत्सवासोबत भविष्याचाही विचार करावा - उत्सवादरम्यान डीजे नियमांचे उल्लंघन, वादविवाद, मारामारी, रस्त्यावरील बेशिस्त वर्तन, वाहतूक नियमांचे उल्लंघन, सार्वजनिक ठिकाणी मद्यप्राशन आणि हुल्लडबाजी, महिलांची छेडछेड, सोशल मिडीयावरील आक्षेपार्ह पोस्ट अशा गैरप्रकारांमुळे गुन्हे दाखल होऊ शकतात. अशा गुन्ह्यांमध्ये अडकल्यास तरुणांच्या भविष्यावर परिणाम होऊ शकतो. शैक्षणिक अभ्यासक्रमांचे प्रवेश, परदेशी शिक्षण, शासकीय नोकरी किंवा इतर संधींसाठी आवश्यक असलेल्या चारित्र्य पडताळणीच्या प्रक्रियेत या बाबींचा विचार होऊ शकतो. त्यामुळे युवकांनी उत्साहाच्या भरात कायद्याचे उल्लंघन होणार नाही, याची विशेष काळजी घ्यावी. 'एक दिवसाचा उत्साह, आयुष्यभराची अडचण होऊ नये, यासाठी विशेष खबरदारी घेणे आवश्यक आहे.

प्रशासनाला सहकार्य - वाहतूक व्यवस्था, मिरवणुकीचे मार्ग, वेळेचे नियोजन, ध्वनीमर्यादा, अग्निसुरक्षा आणि गर्दीच्या व्यवस्थापनाबाबत प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करणे प्रत्येक मंडळाची जबाबदारी आहे. महिला, बालके आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी स्वयंसेवकांची व्यवस्था, मदत कक्ष आणि आपत्कालीन संपर्क यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. प्रशासन आणि गणेशोत्सव मंडळांमधील समन्वयातून उत्सव अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि आनंददायी होईल.

उत्सव काळात स्वच्छतेला प्राधान्य - गणेश मंडपाचा परिसर, मिरवणुकीचे मार्ग आणि विसर्जनस्थळांवर स्वच्छता राखणे ही गणेश मंडळांची आणि यामध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. उत्सवादरम्यानचे निर्माल्य, प्लॅस्टिकच्या पिशव्या, बाटल्या आणि अन्य कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावून स्वच्छतेचा जागर करणे आवश्यक आहे. बाप्पांच्या आगमनावेळी आणि विसर्जनावेळीही परिसर स्वच्छ ठेवण्याचा संकल्प प्रत्येकाने जोपासायला हवा.

महाराष्ट्रासाठी आदर्श गणेशोत्सव घडवूया- लोकसहभागातून साजरा होणाऱ्या महाराष्ट्राच्या गणेशोत्सवाला मोठी सांस्कृतिक परंपरा आहे. या उत्सवाला सामाजिक परिवर्तनाचा विचार लाभला आहे. या परंपरेला पर्यावरण संवर्धन तसेच नागरिकांची सुरक्षितता, सामाजिक बांधिलकीची जोड देण्याची गरज आहे. शासनाच्या वतीने लोककलांवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रम, मातीच्या गणेश मूर्ती कार्यशाळा, उत्कृष्ट गणेश मंडळ स्पर्धा, सजावट स्पर्धा व अन्य उपक्रमांच्या माध्यमांतून पर्यावरण पूरक गणेशोत्सवावर भर देण्यात येत आहे. तसेच प्रदूषणमुक्त परिसर, स्वच्छता, सामाजिक कार्य आणि विधायक उपक्रमांना महत्त्व देण्यात येत आहे. पर्यावरण संवर्धनासोबतच पारंपरिक कलांचे जतन, स्थानिक कलांना प्रोत्साहन आणि ग्रामीण भागातील कारागिरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. गणेशोत्सव हा केवळ उत्सव नाही तर तो लोकसंस्कृती, सामाजिक एकोपा, पर्यावरण संवर्धन आणि जबाबदारीची शिकवण देणारे व्यासपीठ आहे. आनंद साजरा करताना आपला उत्सव पर्यावरणासाठीही मंगलमय ठरावा, यासाठी प्रत्येकानं छोटंसं का होईना पण जबाबदारीनं, आणि मनापासून एकेक पाऊल सकारात्मक दिशेनं उचलणं काळाची गरज आहे. श्री गौरी -गणेशाच्या भक्तीचा उत्साह कायम ठेवून, सामाजिक भान राखून आणि भावी पिढीचे भविष्य सुरक्षित ठेवून यंदाचा गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करुया आणि या उत्सवाचा आनंद द्विगुणीत करुयाः!

**वृषाली पाटील-**
सहायक संचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
कोल्हापूर

# गणेशोत्सव: परंपरेचा, आपुलकीचा आणि नव्या जाणिवांचा उत्सव

**सिंधुदुर्ग** म्हटलं की डोळ्यांसमोर येतो तो निळाशार समुद्र, हिरवीगार डोंगररांग, लाल मातीची वाट, कौलारू घरे, अंगणातली तुळस आणि माणसांच्या मनात जपलेली आपुलकी. या भूमीच्या सांस्कृतिक जीवनात अनेक सण-उत्सवांना विशेष स्थान आहे; मात्र गणेशोत्सवाची गोष्ट काही वेगळीच आहे. कारण इथे गणपती म्हणजे केवळ देवघरात विराजमान होणारी मूर्ती नाही, तर घराला पुन्हा घरपण देणारा, माणसांना पुन्हा एकत्र आणणारा आणि गावाला पुन्हा जिवंत करणारा उत्सव आहे.

श्रावण सुरू झाला की कोकणात गणेशोत्सवाची चाहूल लागते. घरांची साफसफाई सुरू होते, मखराची तयारी होते, अंगण सजते, बाजारपेठा गजबजतात आणि दूरवर नोकरी-व्यवसायासाठी गेलेल्या माणसांच्या परतीची वाट पाहिली जाते. मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई किंवा राज्याच्या इतर भागांत राहणारा कोकणवासी गणपतीसाठी आपल्या गावच्या घराकडे परततो. वर्षभर दूर असलेली भावंडे, नातेवाईक, मित्रमंडळी पुन्हा एकत्र येतात. सिंधुदुर्गाच्या गणेशोत्सवाचे हेच कदाचित सर्वांत मोठे वैशिष्ट्य आहे. बाप्पा येतो आणि माणसं जवळ येतात. सिंधुदुर्गातील गणेशोत्सव हा म्हणूनच श्रद्धेबरोबरच कुटुंब, गाव आणि परंपरेचा उत्सव आहे. जिल्ह्यातील सांस्कृतिक परंपरांमध्ये गणेशचतुर्थीला महत्त्वाचे स्थान असून भजन, फुगड्या आणि विविध लोककला या उत्सवाशी जोडलेल्या आहेत. गावागावांत गणेशोत्सवाच्या काळात वातावरण भक्तिमय करणाऱ्या भजनांच्या तालमी आधीपासून सुरू होतात. अभंग, गौळणी, गजर आणि पारंपरिक वाद्यांचा नाद उत्सवाला वेगळीच रंगत देतो.

या परंपरेत आपल्या मातीचा सुगंध आहे. घरगुती गणपती, गौरीचे आगमन, आरती, नैवेद्य, मोदक, भजन, फुगड्या, नातेवाईकांच्या भेटीगाठी, लहान मुलांचा उत्साह, आजी-आजोबांच्या आठवणी आणि गावच्या मंडळींचे सामूहिक नियोजनङ्घया सगळ्यांनी मिळून सिंधुदुर्गाचा गणेशोत्सव आकार घेतो. कुठे घरातील ज्येष्ठ व्यक्ती परंपरा सांगते, कुठे आई किंवा आजी मुलांना नैवेद्याची पद्धत शिकवते, तर कुठे तरुण मंडळी सजावट, आयोजन आणि डिजिटल माध्यमांची जबाबदारी सांभाळतात. अशा प्रकारे प्रत्येक पिढी आपापल्या पद्धतीने उत्सवात सहभागी होते.

राज्य शासनाच्या वतीने आता गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचे स्वरूप देण्यात आले असून त्यानिमित्त विविध सांस्कृतिक, सामाजिक, पर्यावरणपूरक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्याची संकल्पना पुढे आली आहे. उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी तालुका, जिल्हा आणि राज्यस्तरावर स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, गणेशोत्सवाशी संबंधित रील्स व डिजिटल उपक्रम, प्रमुख गणेशस्थळांचे ऑनलाइन दर्शन आणि विविध क्षेत्रांतील स्थानिक सहभागाला प्रोत्साहन देण्याची दिशा निश्चित करण्यात आली आहे.

या सगळ्या उपक्रमांचा अर्थ उत्सव मोठा, भव्य किंवा खर्चिक करणे एवढाच नाही. उलट, आपली परंपरा जपत उत्सव अधिक अर्थपूर्ण कसा करता येईल, हा त्यामागचा खरा विचार आहे.

गणेशोत्सव मंडळांनी यंदा आपल्या परिसरातील पारंपरिक कला आणि स्थानिक संस्कृतीला सजावटीचा आणि कार्यक्रमांचा केंद्रबिंदू बनवावे. सिंधुदुर्गची दशावतार लोककला, स्थानिक हस्तकला, पारंपरिक वाद्ये, कोकणी-मालवणी संस्कृती, गावचा इतिहास, स्थानिक देवस्थाने, किल्ले, लोकपरंपरा अशा विषयांवर देखावे, प्रदर्शन, कथाकथन किंवा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करता येतील. सिंधुदुर्गच्या सांस्कृतिक ओळखीत दशावताराबरोबर चित्रकथी, गंजिफा, कोळीनृत्य आणि विविध ग्रामपरंपरांना महत्त्व आहे.

मुलांसाठी गणपती म्हणजे आनंदाचा सण. त्यांच्या कल्पनाशक्तीला वाव देणारा उत्सव घडविणे ही मोठ्यांची जबाबदारी आहे. शाडू मातीपासून गणेशमूर्ती बनविण्याच्या कार्यशाळा, गणेशोत्सवावरील चित्रकला, निबंध, वक्तृत्व, कथाकथन, पारंपरिक खेळ, प्रश्नमंजुषा किंवा स्थानिक इतिहासावर आधारित उपक्रम घेता येतील. तरुणांसाठी डिजिटल डिझाइन, रील्स, छायाचित्रण आणि माहितीपट निर्मितीच्या संधी उपलब्ध करून देता येतील. ज्येष्ठ नागरिकांकडून गावच्या गणेशोत्सवाच्या जुन्या आठवणी ऐकून त्या नव्या पिढीपर्यंत पोहोचविता येतील. गणेशोत्सव म्हणजे फक्त मनोरंजन नव्हे; तो पिढ्यांना जोडणारा सांस्कृतिक दुवा आहे.

यंदा या दुव्याला पर्यावरणाची जोड देऊया. बाप्पाच्या स्वागतासाठी शाडू मातीची किंवा पर्यावरणपूरक मूर्ती निवडणे, प्लास्टिकचा वापर टाळणे, नैसर्गिक साहित्याने सजावट करणे, निर्माल्य वेगळे संकलित करणे आणि शक्य तिथे पर्यावरणपूरक विसर्जनाची व्यवस्था करणे, हे प्रत्येक घर आणि मंडळाला सहज शक्य आहे. फुले, पाने, नारळाच्या झावळ्या, बांबू, कापड, कागद, माती आणि स्थानिक उपलब्ध साहित्य वापरून केलेली सजावट ही दिसायलाही सुंदर असते आणि आपल्या मातीतल्या परंपरेशीही जोडलेली असते.

विसर्जन हा भावनेचा क्षण आहे. त्यामुळे तो तितक्याच जबाबदारीने साजरा करणे गरजेचे आहे. जलस्रोत स्वच्छ राहावेत, पाण्याला आणि निसर्गाला हानी पोहोचू नये, निर्माल्य पाण्यात न टाकता स्वतंत्रपणे संकलित करावे, याची काळजी घेऊया. आवश्यक त्या ठिकाणी कृत्रिम विसर्जन तलावांचा वापर करणे, हा देखील पर्यावरणपूरक पर्याय ठरू शकतो. पर्यावरणपूरक गणेशोत्सव, निर्माल्य संकलन, पुनर्वापर आणि प्लास्टिकमुक्त उत्सवासाठी व्यापक जनजागृती करण्याची दिशा यंदाच्या उपक्रमांमध्येही अधोरेखित करण्यात आली आहे. ऊर्जेची बचत हा देखील उत्सवाचा एक सुंदर संकल्प होऊ शकतो. सजावटीसाठी दिवसभर अनावश्यक विद्युत रोषणाई ठेवण्याऐवजी गरजेपुरतीच रोषणाई, एलईडी दिव्यांचा वापर, शक्य असल्यास सौरऊर्जेवर आधारित सजावट आणि वेळेचे नियोजन यामुळे उत्सवाचा आनंद कमी होत नाही; उलट जबाबदार उत्सवाची नवी ओळख निर्माण होते. ऊर्जा बचतीचा संदेश देणारा गणेशोत्सव ही पुढच्या पिढीसाठीची चांगली शिकवण ठरेल.

उत्सव हा समाजाला जोडण्यासाठी असतो. म्हणून मंडळांच्या कार्यक्रमांमध्ये स्थानिक बचत गट, कारागीर, कलाकार, शेतकरी, लघुउद्योजक आणि स्थानिक उत्पादनांना स्थान देता येईल. गणेशमूर्ती, मखर, सजावट, पूजासाहित्य, पारंपरिक खाद्यपदार्थ, हस्तकला किंवा स्थानिक कलाकृती यांना प्रोत्साहन दिल्यास उत्सवाचा आनंद गावच्या अर्थव्यवस्थेलाही हातभार लावू शकतो. महिलांच्या बचत गटांना स्थानिक खाद्यपदार्थ किंवा प्रसादाच्या उपक्रमात सहभागी करून घेता येईल. स्थानिक कलाकारांना व्यासपीठ देणे म्हणजे आपल्या संस्कृतीला पुढे नेणे होय. अशा स्थानिक सहभागाची दिशाही प्रस्तावित उपक्रमांमध्ये आहे. आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे उत्सवातील प्रत्येकाचा सहभाग. एखाद्या मंडळाचा उत्सव केवळ काही कार्यकर्त्यांचा न राहता तो संपूर्ण परिसराचा उत्सव व्हावा. ज्येष्ठांसाठी सांस्कृतिक मैफल, महिलांसाठी पारंपरिक खेळ किंवा कौशल्य प्रदर्शन, मुलांसाठी सर्जनशील उपक्रम, तरुणांसाठी क्रीडा व डिजिटल स्पर्धा आणि सर्वांसाठी सामूहिक आरती, भजन किंवा सांस्कृतिक कार्यक्रम असे विविध उपक्रम उत्सवाला सर्वसमावेशक बनवू शकतात. सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता, सुरक्षितता आणि गरजूंसाठी मदत अशा छोट्या उपक्रमांमधून उत्सवाचे सामाजिक रूप अधिक सुंदर करता येईल.

यंदा उत्कृष्ट गणेशोत्सव मंडळांच्या स्पर्धेतही मोठ्या उत्साहाने सहभागी होऊया. ही स्पर्धा केवळ सजावट किंवा देखाव्याची नसून उत्सव कसा साजरा केला, परंपरा किती जपली, समाजाचा सहभाग किती वाढविला, पर्यावरणाची काळजी किती घेतली आणि उपक्रमांमधून किती सकारात्मक संदेश दिला, याचेही एक सुंदर व्यासपीठ बनू शकते.

आजच्या डिजिटल युगात आपल्या गावचा गणपती जगभर पोहोचविण्याची संधीही प्रत्येकाच्या हातात आहे. यासाठी रील्स, छायाचित्रण आणि डिजिटल उपक्रमांना प्रोत्साहन देण्याची कल्पनाही पुढे आली आहे. मात्र डिजिटल उत्साहात प्रत्यक्ष उत्सवाचा आत्मा हरवता कामा नये. मोबाईलच्या कॅमेऱ्याआडून बाप्पाकडे पाहण्यापेक्षा काही क्षण मोबाईल बाजूला ठेवून आरतीत सहभागी होणे, आजी-आजोबांशी गप्पा मारणे, मुलांसोबत प्रसाद वाटणे आणि शेजाऱ्यांच्या घरी जाऊन गणपतीचे दर्शन घेणे. या छोट्या गोष्टीच तर या उत्सवाला खरेपण देतात. सिंधुदुर्गचा गणेशोत्सव मुळातच माणसांचा उत्सव आहे. लाल मातीच्या अंगणातला बाप्पा शहरातल्या उंच इमारतीत राहणाऱ्यालाही आपलासा वाटतो आणि समुद्रकिनाऱ्यालगतच्या छोट्याशा घरात राहणाऱ्यालाही. इथे बाप्पासोबत येते ती माणसांची ऊब. गावात उत्सवाला आलेला कोकणवासी, घरातली लगबग, शेजारच्या काकूंचा प्रसाद, मित्रमंडळींच्या भेटी, रात्रीची भजनाची मैफल, मुलांचे खेळ आणि विसर्जनाच्या वेळी डोळ्यांत दाटणारी भावनाङ्घया सगळ्यांनी गणेशोत्सवाची एक स्वतंत्र कोकणी ओळख निर्माण केली आहे. ही ओळख जपायची आहे. मात्र जतन म्हणजे परंपरेला जशीच्या तशी बंदिस्त ठेवणे नव्हे. परंपरेचा आत्मा कायम ठेवत तिच्यात काळानुरूप चांगल्या गोष्टींची भर घालणे, हीच खरी सांस्कृतिक समृद्धी आहे. म्हणून यंदा बाप्पाचे स्वागत पारंपरिक पद्धतीने करूया. स्थानिक कला जपूया. आपल्या गावच्या कलाकारांना संधी देऊया. मुलांना आपल्या संस्कृतीशी जोडूया. ज्येष्ठांच्या आठवणी जतन करूया. पर्यावरणाची काळजी घेऊया. पाण्याचे आणि विजेचे महत्त्व समजून घेऊया. प्लास्टिकला नकार देऊया. निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन करूया. स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देऊया. उत्कृष्ट गणेशोत्सवाच्या स्पर्धेत सहभागी होऊया. आणि आपल्या उत्सवातून असा संदेश देऊया की आनंदासाठी निसर्गाला किंमत मोजावी लागत नाही.

गणेशोत्सवाच्या काळात विविध श्रद्धा, परंपरा आणि सामाजिक भावना आपल्या आसपास नांदत असतात. त्यामुळे आपल्या आनंदासोबत इतरांच्या श्रद्धांचा आणि भावनांचा आदर राखणे हीदेखील उत्सवाचीच संस्कृती आहे. संयम, परस्पर सन्मान, आपुलकी आणि सलोखा यामुळे उत्सवाचा आनंद अधिक खुलतो. कोणाच्याही भावना दुखावणार नाहीत, याची जाणीव ठेवून आनंद साजरा केला तर आपल्या उत्सवाची उंची आणखी वाढेल.

बाप्पा आपल्याला बुद्धी, विवेक आणि सद्भावनेचा आशीर्वाद देतो, असे आपण मानतो. मग यंदाचा उत्सवही त्याच मूल्यांना साजेसा का नसावा?

आनंद असू दे, पण त्याला
संवेदनशीलतेची साथ असू दे.
उत्साह असू दे, पण त्याला
शिस्तीची जोड असू दे.
परंपरा असू दे, पण त्यासोबत
नव्या पिढीची सर्जनशीलता असू दे.
सजावट असू दे, पण निसर्गाची किंमत मोजून नव्हे.
रोषणाई असू दे, पण ऊर्जेची उधळपट्टी नको.
उत्सव असू दे, पण त्यात प्रत्येकाचा सहभाग असू दे.

सिंधुदुर्गच्या लाल मातीतील हीच आपली गणेशोत्सवाची खरी ओळखङ्घभक्ती, परंपरा, कुटुंब, गाव, कला, निसर्ग आणि माणुसकी यांना एकत्र आणणारा उत्सव.यंदा बाप्पाचे स्वागत अशाच समृद्ध भावनेने करूया. गणपती बाप्पा मोरया!

**- सचिन अडसूळ,**
(जिल्हा माहिती अधिकारी, सिंधुदुर्ग)
-९०४९९८७२९८/७०२०२८१३७०

# महिला व मुलींचे मनोरथ पूर्ण करणारा ‘हरितालिका’ तृतीया उत्सव

**भारत** हा सण व उत्सवांचा देश आहे. भारतीय सण व उत्सवांना ऐतिहासिक तसेच धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व आहे. आजही आपल्या देशातील नागरिक आपले पारंपारिक सण मोठ्या उत्साह व आनंदाने पार पाडतात. या निमित्ताने विविध पारंपारिक पद्धती व रूढींचा स्वीकार करून आपले मनोगत मनिच्छा या रूपाने व्यक्त करतात. सण व उत्सवाच्या या गौरवमयी परंपरेमुळेच आज भारतीय समाजात स्थिरत्व शांती व सम ाधान आहे. आजही नितीमुल्ये सांस्कृतिक मूल्ये या सण व उत्सवामुळे टिकून आहे.

भारतात श्रावण व भाद्रपद हे दोन महिने अतिशय पवित्र मानल्या जातात. सर्व धर्मियांसाठी नैसर्गिक व धार्मिकदृष्ट्या ही हे दोन महिने अत्यंत महत्त्वाचे व मांगल्याचे असतात. निसर्ग सृष्टी सौंदर्याने नटलेला असतो. सगळीकडे आनंदी आनंद असतो व यात भर पडते ती विविध सण व उत्सवांची.

भाद्रपद शुद्ध तृतीयाला ‘हरितालिका’ हा उत्सव महिलांसाठी अत्यंत महत्त्वाचा उत्सव असतो. कुमारिका व सुवासिनी या दोन्हीसाठी हा उत्सव मनोरथ पूर्ण करणारा समजला जातो. कुमारिका अनेक मनोरथ रचतात तर सुवासिनी अपेक्षा व इच्छा पूर्णत्वाचे मनोरथ रचतात.

भगवान भोलेनाथा हे चटकन पावणारे दैवत आहे. भगवान शंकराची मनोभावे पूजा, अर्चा केली व त्यांच्यावर श्रद्धा ठेवली तर भोलेनाथ उपासकाचे व उपासिकेची मनोरथ पूर्ण करतात.

कुमारिकांसाठी या व्रताचे महत्त्व-



कुमारिका मुली श्रावणातही महादेवाच्या दर्शनासाठी भल्या पहाटेच उठून दर्शनाला लाईन लावतात. भाद्रपद शुद्ध तृतीयाला कुमारिका मुली भल्या सकाळी उठतात आपले सर्व विधी आटोपल्यावर नदीतून वाळू आणतात ती वाळू स्वच्छ धुवून घेतात आणि लाकडी पाटावर त्या वाळूची तीन शिवलिंग बनवतात किंवा हरितालिकेच्या मूर्तीची पूजा करतात. आपले मनोगत त्या शिवलिंगासमोर व्यक्त करतात विशेषत: कुमारिका चांगला पती मिळावा म्हणून हे व्रत पाळतात.

सुवासिनीसाठी व्रताचे महत्त्व-

सुवासिनीसुद्धा भाद्रपद शुद्ध तृतीयाला भल्या पहाटे उठून नदीवर जातात किंवा नदीतील आणलेल्या वाळूचे तीन शिवलिंग तयार करतात व त्यांची मनोभावी पूजा करतात किंवा हरितालिकेच्या मूर्तीची पूजा करतात आपला संसार सुख-समृद्धी व चांगला व्हावा म्हणून सुवासिनी हे व्रत पाळतात. या दिवशी स्त्रिया उपवास करतात. हे व्रत पार्वतीने केले व तिचे मनोरथ फलद्रुप झाले म्हणून तेव्हापासून इतर स्त्रिया ही हे व्रत करू लागल्या आहेत त्या आजपर्यंतच्या स्त्रियाही हे व्रत करीत आहेत.

हरतालिका हे व्रत पार्वतीने शंकर आपल्याला पती म्हणून मिळावा यासाठी केले होते असे मानले जाते. तेव्हांपासून आपल्याला जोडीदार मनासारखा व चांगला मिळावा म्हणून कुमारिकांनी हे व्रत करावे असा प्रघात आहे आणि लग्नानंतर मनासारखा जोडीदार मिळाला म्हणून आणि जन्मोजन्मी असाच जोडीदार मिळावा म्हणून नंतरही स्त्रिया हे व्रत करतात. मंगळागौरीच्या पूजेप्रमाणेच हिरव्या बांगडया २, कंगवा, आरसा, कुंकू, करंडा इ. साहित्य आणून, शंकराची प्रतिमा म्हणून वाळूची पिंड करून पूजा करतात. सात प्रकारची प्रत्येकी सात सात पाने गोळा करून ती शंकराला वहातात. त्यापैकी मुख्य पान म्हणजे रूईचे व बेलाचे पान. ही दोन्ही पाने ह्या पूजेत आवश्यकच आहेत. पूजा झाल्यावर हरतालिकेची आरती म्हणतात व कहाणी वाचतात. त्यादिवशी बायका कंदमुळाशिवाय काहीही खात नाहीत.

रात्री बारा वाजता रूईच्या पानावर मध घालून चाटतात. दुसरे दिवशी आंघोळ करून हरतालिकेची आरती करून उपवास सोडतात. हरतालिकेच्या दिवशी बायका एकत्र येऊन रात्री बारा वाजेपर्यंत जागरण करतात खेळ,
फुगडया, गाण्याच्या भेंडया खेळतात. या दिवशी स्त्रिया इतर स्त्रियांना सौभाग्यवाणे देतात. दुसऱ्या दिवशी उत्तरपूजा करतात.

## गणेशोत्सव

गणेशोत्सवाचे दिवस झाले आता सुरू
गणपती बाप्पाची सेवा आपण करू
गणपती उत्सवात आनंद सर्वत्र
उत्सवात जमतात सर्व एकत्र
गणपती बाप्पाची सेवा असे मोठी
गणपती आरती सर्वांच्या ओठी
गणपती बाप्पाचे मोदक न्यारे
सर्विकडे गणपतीच्या आरतीचे वारे
गणेशोत्सवात असतो आनंद भारी
लुटू आपण सारी, सारी

**– धोंडीरामसिंह राजपूत**


# ‘हरितालिका’

**भाद्रपद** शुद्ध तृतीयेला ‘हरितालिका’ हा उत्सव महिला व मुलींसाठी महत्वाचा मानला जातो,सुवासिनी महिला व कुमारिका महिला साठी हा उत्सव मनोरथ पूर्ण करणारा उत्सव समजला जातो. सुवासिनी महिला आपल्या कौटुंबिक व पारिवारिक इच्छा –आकांक्षा भगवान शंकर समोर ठेवतात तर कुमारिका मुली आपलं भवितव्य उज्वल राहो, आपली स्वप्न पूर्ण होवोत साठी भोलेनाथ यांची पूजा करतात.

सुवासिनी साठी या व्रताचे महत्व– सुवासिनी महिला भाद्रपद शुद्ध तृतीयेला भल्या पहाटे उठून सकाळचे सर्व विधी आटोपून नदीवर जातात किंवा नदीतून आणलेल्या वाळूचे घरीच तीन शिवलिंग तयार करतात,त्यांची मनोभावे पूजा करतात व हरितालिकेच्या मूर्तीची ही पूजा करतात व प्रार्थना करतात की, आमचा संसार सुख ,समृद्धी ने पूर्ण व चांगला होओ या दिवशी महिला उपास करतात.

कुमारिका मुलीं– कुमारिका मुलीं ही भल्या पहाटे उठून नदीतील आणलेल्या वाळूचे लाकडी पाटावर तीन शिवलिंग बनवितात,त्याही हरितालीका मूर्ती व शिवलिंगाची पूजा करतात,व आपले मनोगत व्यक्त करतात व स्वप्न पूर्ण होऊ दे अशी शिवलिंग व हरितालिका मूर्तीला प्रार्थना करतात, मुख्यत्वे हा सण सुवासिनी व कुमारिकांच्या मनोरथला पूर्णत्व देणारा उत्सव मानला जातो. भगवान शंकर किंवा त्यांचे शिवलिंग अत्यंत पवित्र व मंगलमय मानतात, कारण भोलेनाथ लवकर प्रसन्न होणारे दैवत आहे,तर हरितालिका मूर्ती समोर ही मनोरथ व्यक्त केल्यास ते पूर्णत्वास जातात असे मानतात.

**– धोंडीरामसिंह राजपूत**



## मंगलमूर्ती

जयदेव!जयदेव !!
जय मंगल मूर्ती
जगभर तुमच्या
ज्ञानाची कीर्ती
तुमच्या उत्सवात
दर्शनासाठी रिघ
समोर तुमच्या
मोदकांचा ढिग
मंगल तुमची आरती
आम्हीही गातो
दु:ख हरण्यासाठी
चरणी विनवणी करतो
बाप्पा जगी तुमची
महान असे थोरवी
सर्वांच्या तोंडी
आरतीचीच गोडवी
जगी उत्सव असे
तुमचाच महान
रमती उत्सवात
थोर आणि लहान...

# कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाची नवी फळी सज्ज; ५ पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

**संघटनात्मक बळकटीकरणावर भर**







छत्रपती संभाजीनगर, दि. १२ (प्रतिनिधी) – कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या संघटनात्मक बळकटीकरणासाठी महासंघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या महत्त्वपूर्ण नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. कर्मचारी हित, संघटनेची एकजूट आणि विविध कर्मचारी प्रश्नांचा प्रभावीपणे पाठपुरावा करण्यासाठी सक्षम नेतृत्वाची नवी फळी सज्ज करण्यात आली आहे.

महासंघाच्या नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांमध्ये सुमित भुईगळ यांची वरिष्ठ उपाध्यक्षपदी, रविंद्र कांबळे यांची संघटन सचिवपदी, बि. एम. म्हस्के यांची अतिरिक्त सरचिटणीसपदी, सुशीलकुमार बनकर यांची विभागीय अध्यक्षपदी, तर वाल्मिक घायतिलक यांची जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्त्यांमुळे कास्ट्राईब कर्मचारी महासंघाच्या संघटनात्म क कार्याला अधिक बळ मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. कर्मचारी वर्गाच्या विविध प्रलंबित प्रश्नांसह न्याय्य मागण्यांसाठी संघटितपणे आणि प्रभावीपणे आवाज उठविण्याची जबाबदारी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांवर सोपविण्यात आली आहे.

कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करण्याबरोबरच संघटनेचा विस्तार तळागाळापर्यंत करण्यासाठी नवनिर्वाचित पदाधिकारी सक्रियपणे कार्य करणार आहेत. कर्मचारी हिताच्या विविध विषयांना प्राधान्य देत संघटनेला अधिक सक्षम आणि गतिमान करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. दरम्यान, नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीबद्दल कास्ट्राईब कर्मचारी महासंघाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कर्मचारी वर्गातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, पुढील संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## ऑनलाइन सुविधांचा लाभ घ्यावा

दरम्यान, कास्ट्राईब भूमी अभिलेख कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्याचे सरचिटणीस आर. एम. कांबळे यांनी नागरिकांनी ‘महाभूमी महाराष्ट्र’ पोर्टलचा जास्तीत जास्त वापर करून ऑनलाइन उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे. ‘सरकारी कार्यालयात जाण्याऐवजी सेवा आता नागरिकांच्या मोबाईलवर’ या संकल्पनेला या डिजिटल उपक्रमामुळे मोठी चालना मिळणार आहे. डिजिटल सुविधेमुळे नागरिकांचा वेळ, पैसा आणि श्रम वाचणार असून शासकीय कामकाजात पारदर्शकता व गतिमानता वाढण्यास मदत होणार आहे, असे संघटन सचिव आर.एन. कांबळे यांनी सांगितले.

# बेगमपुरा पोलिसांची गणेशोत्सवात नागरिकांना अनोखी भेट; चोरीचे व हरवलेले ३५ मोबाईल परत

छत्रपती संभाजीनगर, दि. १२ (प्रतिनिधी) – गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बेगमपुरा पोलिसांनी नागरिकांना अनोखी आणि आनंदाची भेट दिली. विविध गुन्ह्यांम ध्ये चोरीला गेलेले, फसवणुकीत लुबाडलेले तसेच हरवलेले तब्बल ३५ मोबाईल फोन पोलिसांनी शोधून काढत संबंधित नागरिकांना परत केले. यामुळे महिला, ज्येष्ठ नागरिक, युवक आणि पुरुषांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले.




मा. पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस उपायुक्त पंकज अतुलकर आणि सहायक पोलीस आयुक्त सागर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही विशेष कारवाई करण्यात आली. बेगमपुरा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक प्रविणा यादव यांच्या नेतृत्वाखालील पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे विविध ठिकाणांहून हे मोबाईल हस्तगत केले.

विशेष म्हणजे महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, पंजाब, कर्नाटक, झारखंड आणि उत्तर प्रदेश आदी राज्यांमधून हे मोबाईल शोधून काढण्यात पोलिसांना यश आले. यामध्ये घाटी रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या रुग्णांच्या नातेवाईकांचे हरवलेले मोबाईल तसेच चोरी व फसवणुकीच्या घटनांमध्ये गम ावलेले मोबाईल यांचा समावेश आहे. मोबाईल परत मिळाल्यानंतर नागरिकांनी बेगमपुरा पोलिसांचे आभार मानत समाधान व्यक्त केले. गणेशोत्सवाच्या काळात पोलिसांनी नागरिकांच्या चेहऱ्यावर आणलेले हे हास्य म्हणजेच त्यांच्या कार्याची सकारात्म क पावती असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या कारवाईत पोलीस निरीक्षक प्रविणा यादव, हेड कॉन्स्टेबल कचरे, महिला पोलीस कॉन्स्टेबल साक्षी संकमवड आणि पोलीस कॉन्स्टेबल सोर यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

**नागरिकांकडून बेगमपुरा पोलिसांचे अभिनंदन!**

## खव्याचे मोदक

**साहित्य :** खवा १ वाटी (खवा शक्यतो खाऊन बघून आणावा म्हणजे ताजेपणा कळतो.), पिठीसाखर अर्धी वाटी, मिल्क पावडर ३ टीस्पून, वेलची, जायफळ पूड, केशर.

**कृती :** खवा पुरणयंत्रातून काढावा किंवा किसून घ्यावा. पॅनमध्ये तूप सुटेपर्यंत मंद गॅसवर भाजावा. उतरवून त्यात साखर, मिल्क पावडर, वेलची, जायफळपूड, केशरी रंग किंवा केशर घालून चांगले एकत्र करावे. जरा सुकले की साच्याला तूप लावून छोटे-छोटे गोळे त्यात भरावेत. जास्तीचे मिश्रण काढून, मोदक काढून हवेवर ठेवावे. २१ मोदक एका ताटात सजवून नैवेद्य दाखवून खायला द्यावेत.

### पंचखाद्य खिरापत

**साहित्य :** ३/४ कप किसलेले सुके खोबरे, १ टीस्पून खसखस, १५० ग्राम खडीसाखर, ४ वेलचींची पूड, ६ ते ७ खारका, ८ ते १० बदाम

**कृती :** खारकांच्या बिया काढून टाकाव्यात आणि खारकांची पूड करून घ्यावी. बदामाची बारीक पूड करून घ्यावी. किसलेले सुके खोबरे, खसखस, बदामाची पूड आणि खारकांची पूड मध्यम आचेवर भाजून घ्यावी. खडीसाखर थोडी कुटून घ्यावी. भाजलेले खोबरे, भाजलेले खसखस, भाजलेली बदाम-खारकांची पूड, खडीसाखर आणि वेलचीपूड एकत्र करून मिक्सरमध्ये भरडसर खिरापत तयार करून घ्यावी.

# गणरायाकरिता मोदक मस्टच..



**गौरी-गणपतीचे सण आले की, आठवतो तो मोदकांचा नैवेद्य. तांदळाच्या पिठीपासून बनवलेले उकडीचे मोदकच नाही तर अगदी गव्हाच्या पिठाचे तळलेले मोदकही या दिवसांत चविष्ट लागतात.. मोदकांचे अनेक प्रकार या दहा दिवसांत हमखास केले जातात. गणरायाच्या आगमनाच्या लगबगीत तूप मोदकांचा बेत म्हणजे.. दुधात साखर..**

## उकडीचे मोदक



साहित्य : २ वाटया़ तांदळाचे पीठ, २ वाटया़ गूळ, एका नारळाचे खवलेले खोबरे, पाव वाटी खसखस, २ चमचे तूप, वेलची पूड.

कृती : खवलेले खोबरे व गूळ एकत्र करून शिजवावे. त्यात भाजून घेतलेली खसखस व वेलची पूड घालून घट्ट सारण करून घ्यावे. जितके तांदळाचे पीठ तितकेच पाणी मोजून घेऊन ते पाणी पातेल्यात उकळत ठेवावे. त्यात किंचित मीठ व

२ चमचे तूप घालावे. उकळी आल्यावर पातेले गॅसवरून खाली उतरवावे. व त्यात तांदळाचे पीठ घालून नीट ढवळून घ्यावे. पुन्हा गॅसवर पातेले ठेवून २ वाफा आणून घ्याव्यात. पातेले खाली उतरवून उकड गरम असतानाच मळावी. उकडीची लिंबाएवढी गोळी घेऊन तिला हाताने वाटीचा आकार द्यावा. त्यात खोब-याचे सारण भरून कडा थोडया़ थोडया़ अंतरावर चिमटीने दाबून तोंड बंद करावे. वर टोक आणावे. खरे तर अशा २१ पाकळ्या आल्या तर मोदक उत्तम होतात, पण जर तसे होत नसेल तर मोदकास कमीत कमी ७-८ पाकळ्या तरी यायला हव्या. नंतर हे मोदक, मोदक पात्रात किंवा इडली पात्रात २० मिनिटे वाफवून घ्यावेत. किंवा पातेल्यातील उकळत्या पाण्यावर चाळणी ठेवून त्यावर मोदक ठेवावेत व झाकणी ठेवून चांगले वाफवून घ्यावेत. तयार शिजलेले मोदक साजूक तुपाबरोबर खावेत.

## तळलेले मोदक

**साहित्य :** १ वाटी मैदा किंवा गव्हाचे पीठ, १ वाटी बारीक रवा, ४ चमचे तूप किंवा तेल, सारणासाठी १ खवलेला नारळ, २ वाटया़ गूळ, पाव वाटी खसखस, वेलचीपूड, तळण्यासाठी तूप किंवा तेल.

**कृती :** रवा व मैदा तुपाचे मोहन व पाणी घालून घट्ट भिजवावा. हा गोळा एक तासभर ओल्या फडक्याने झाकून ठेवावा. खवलेला नारळ, गूळ, भाजलेली खसखस व वेलचीपूड घालून सारण घट्ट शिजवून घ्यावे. रवा-मैदा तासभर भिजल्यानंतर गोळा छान मळून घ्यावा. त्याचे छोटे-छोटे गोळे करावेत. एक -एक गोळा पुरीप्रमाणे लाटून घ्यावा. पुरी हातावर घेऊन त्यावर सारण भरून मोदकाचा आकार द्यावा. हे मोदक तुपात किंवा तेलात तळून घ्यावेत. मोदक खुसखुशीत होतात.



### उत्तम मोदकांकरिता

**स्वयंपाकातील काही कठीण पदार्थांमध्ये मोदकांचा समावेश होतो. उकडीच्या पिठाची पारी नीट न पडणे, सारण नीटसे न होणे, अशा अनेक गोष्टी उकडीच्या मोदकांमध्ये अडसर आणतात.**

- उकडीच्या मोदकासाठी तांदळाची पिठी शुभ्र, बारीक, चाळून घ्यावी. नवीन तांदळाची पिठी वापरल्यास योग्य तो चिकटपणा येऊन मोदक नीट वळले जातात.
- पिवळा गोड गूळ चिरून घ्यावा. नारळाचे खोबरे तडे पडलेले नसावे. यासाठी नारळ फोडल्यावर वाटया़ पाणी घालून ओल्या करून घ्याव्यात.
- गुळाच्या ऐवजी साखर वापरल्यास फक्त वेलची पूड घाला. आणि रवाळ किंचितसे ओलसर सारण आदल्या दिवशी करून ठेवा.
- मोदक करताना पिठी गरम असेल तर मुरक्या म्हणजे पा-या छान पडतात. मोदक वाळल्यावर पाण्यात बुडवून मग उकडायला ठेवा. त्याने मोदक दिसायला तुकतुकीत होतात. शिवाय तडा जाऊन फुटत सुद्धा नाही.

# रेल्वे रुळांवर अनधिकृत प्रवेश करून सोशल मीडियावर रील; तात्काळ कारवाई

वाशिम, दि. ११ (प्रतिनिधी) – रेल्वे प्रवाशांची सुरक्षितता आणि रेल्वे परिसरातील सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत रेल्वे सुरक्षा दल (RPF), अकोला यांनी वाशिम रेल्वे स्थानक परिसरात रेल्वे रुळावर रील बनवून सोशल मीडिया वर पोस्ट करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध तात्काळ कारवाई केली.

दिनांक ०६.०९.२०२६ रोजी सकाळी सुमारे ११ वाजता, वाशिम रेल्वे स्थानक परिसरातील रेल्वे रुळांवर एका अज्ञात व्यक्तीने रील बनवून सोशल मीडियावर व्हायरल केली. याची गांभीर्याने दखल घेत श्री. सलीम खान, सहायक पोलीस निरीक्षक, रेल्वे सुरक्षा बल, वाशिम यांनी तत्काळ पाळत ठेवून सखोल चौकशी सुरू केली.

तपासादरम्यान संबंधित व्यक्तीची ओळख अमोल यादव, वय २९ वर्षे, रा. पांगरी नवघरे, ता. मालेगाव, जि. वाशिम अशी निष्पन्न झाली. त्यानंतर दिनांक ०७.०९.२०२६ रोजी ठझत्र पथकाने संबंधिताच्या निवासस्थानी जाऊन त्यास पुढील आवश्यक कारवाईसाठी RPF पोस्ट वाशिम (OP) येथे आणले. चौकशी पूर्ण झाल्यानंतर संबंधिताविरुद्ध रेल्वे कायदा, १९८९ मधील कलम १४७ व १४५ अन्वये आवश्यक कारवाई करण्यात आली. तसेच भारतीय न्याय संहिता (BNSS) च्या कलम ३५ (३) अन्वये नोटीस बजावून त्यास नियमानुसार सोडण्यात आले.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# दुष्काळी परिस्थितीबाबत जिल्हाधिकाऱ्यांना तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून आढावा



नागपूर दि.१२ (प्रतिनिधी)- दुष्काळसदृश परिस्थिती असलेल्या राज्यातील १८जिल्ह्यांचा आढावा घेण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज या जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांशी दूरदृश्य संवादप्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) संवाद साधला. मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत निर्णय घेऊन तात्काळ उपाययोजना करता याव्या यासाठी संबंधित

जिल्हाधिकाऱ्यांनीजिल्ह्यातील पिकांच्या झालेल्या नुकसानीसह उद्धवलेल्या परिस्थितीबाबत मुद्देसूद व सविस्तर अहवाल तात्काळ सादर करण्याचे आदेश त्यांनी यावेळी दिले.

बैठकीस खासदार माया इवनाते, सर्वश्री आमदार प्रवीण दटके, मोहन मते, समीर मेघे, चरणसिंग ठाकूर, डॉ.राजीव पोतदार, पोलीस आयुक्त विश्वास नांगरे-पाटील, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, महापालिकेचे आयुक्त विपीन इटनकर, ग्रामीणचे पोलीस अधीक्षक हर्ष पोद्दारयांच्यासह विभागप्रमुख उपस्थित होते.

दुष्काळसदृश परिस्थिती असलेल्या जिल्ह्यांमध्ये अहिल्यानगर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, धाराशिव, बीड, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, वाशीम, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर आणि नंदुरबार या १८ जिल्ह्यांचा समावेश आहे.

मराठवाडा विभागात सोयाबीन, कापूस, तूर, हळद, उडीद आणि मूग, विदर्भात कापूस, मूग, उडीद, तूरतरनागपूर आणि अमरावती जिल्ह्यांत संत्र्याचे नुकसान झाले आहे. ढगाळ वातावरणामुळे संत्रा पिकावर बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाला असून धाराशिव, बीड आणि जालना जिल्ह्यांत जनावरांसाठी चाऱ्याची टंचाई निर्माण झाली आहे. तसेच ऊस कारखाने लवकर सुरू झाल्यास गळीत हंगाम कमी कालावधीचा राहील, ज्यामुळे चाराटंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे. सोलापूर जिल्ह्यात कांदा लागवड कमी होण्याचा अंदाज असून दुष्काळाबाबत नोंदवण्यात आलेली महत्त्वाची निरीक्षणे पालकमंत्र्यांनी यावेळी जिल्हाधिकाऱ्यांसमोर नोंदवली.

या परिस्थितीवर तात्काळ उपाययोजना करता यावी म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी सद्य स्थितीचा आढावा घेऊन तातडीने अहवाल सादर करावा. प्राप्त अहवालाच्या आधारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सविस्तर चर्चा करून प्रभावी उपाययोजना राबविण्यात येतील. या जिल्ह्यांतील स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या सूचना विचारात घेऊन त्यांच्या सहकार्याने या परिस्थितीवर आवश्यक त्या सर्व उपाययोजना प्राधान्याने राबवल्या जातील असे श्री बावनकुळे यांनी सांगितले. यावेळी संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# वेदांतनगर येथील क्रीडा संकुलाचे काम गतीने पूर्ण करा

## आयुक्त अमोल येडगे यांची प्रकल्पस्थळाची पाहणी; संबंधितांना निर्देश



छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- वेदांतनगर येथील पोहण्याचा तलाव व मल्टीपर्पज हॉल बीओटी तत्त्वावर विकसित करण्यात येत असलेल्या क्रीडा संकुलाची छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी आज पाहणी केली. प्रकल्पाची सद्यस्थिती, उपलब्ध सुविधा आणि सुरू असलेल्या कामांचा आढावा घेत सर्व कामे निर्धारित वेळेत व गतीने पूर्ण करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांना दिले.

वेदांतनगर येथील या प्रकल्पासाठी सुमारे ४०,६९१ चौ.मी. क्षेत्रफळ उपलब्ध असून, या ठिकाणी मल्टीपर्पज हॉल, सहा लेनचा पोहण्याचा तलाव तसेच त्यास पूरक विविध सुविधा विकसित करण्याचे नियोजन आहे. याशिवाय महानगरपालिकेच्या हिस्स्यामध्ये २०० चौ.मी. क्षेत्रफळाचा हॉल उपलब्ध होणार आहे.

सदर प्रकल्प बीओटी तत्त्वावर विकसित करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून, प्रकल्पासाठी ३० वर्षांच्या कालावधीसाठी भाडेपट्टा देण्याची तरतूद करण्यात आली आहे. प्रकल्पास नगररचना विभागामार्फत भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झाले असून, भाडेपट्टा करारनामा देखील करण्यात आलेला आहे.

प्रकल्पाशी संबंधित भाडेपट्टा व इतर आर्थिक बाबींचा आढावाही यावेळी घेण्यात आला. संबंधितांनी महानगरपालिकेकडे भरावयाच्या रक्कमा व दंडाची रक्कम भरलेली असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. प्रकल्पाची पुढील कार्यवाही नियमानुसार पूर्ण करून नागरिकांना क्रीडा व मनोरंजनाच्या सुविधा लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त अमोल येडगे यांनी दिल्या.

यावेळी उपायुक्त विकास नवाळे यांच्यासह महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी, कर्मचारी व प्रकल्पाशी संबंधित ठेकेदार उपस्थित होते.

# भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीः महाडीबीटी १.० पोर्टल सुरु

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- सामाजिक न्याय विभागामार्फत भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते, या योजनेची प्रक्रिया सुलभ होण्यासाठी महाडीबीटी १.० पोर्टल सुरु झाले आहे. या पोर्टलवरील अर्ज तात्काळ निकाली काढण्याबाबतचे आवाहन सर्व संबंधित प्राचार्यांना सहाय्यक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केले आहे. सन २०२५-२६ व त्यापुर्वीचे अनु.जाती प्रवर्गातील विदयार्थ्यांचे महाविद्यालयस्तरावरील व विद्यार्थीस्तरावरील प्रलंबित अर्ज जिल्हयातील सर्व शासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कनिष्ठ, वरिष्ठ, व्यावसायिक, बिगर व्यावसायिक, महाविद्यालयातील प्राचार्यांनी प्रलंबित असलेले पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज तात्काळ दोन दिवसात फॉरवर्ड करावेत, असे आवाहन सहायक आयुक्त डॉ.अनिता राठोड यांनी केले आहे.

# उन्नती सोशल फाउंडेशनच्या पर्यावरणपूरक गणेशमुर्ती कार्यशाळेत रमले बाल मुर्तीकार



पुणे दि.१२ (प्रतिनिधी)- श्री गणेश उत्सवाच्या आगमना प्रित्यर्थ येथील उन्नती सोशल फाउंडेशनच्या वतीने लहान मुलांसाठी घेण्यात आलेल्या पर्यावरणपूरक गणेशमुर्ती कार्यशाळेत लहान मुलांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. शनिवार दि. १२ रोजी सकाळी उन्नती कार्यालयाच्या प्रांगणात झालेल्या या कार्यशाळेत सहभागी मुलांना शाडूची माती देऊन त्यापासून तयार करण्यात येणाऱ्या गणेश मुर्तींचे प्रशिक्षण देण्यात आले. जवळपास अडीचशे मुलामुलींनी या कार्यशाळेत छोट्या आकारातील विविध गणेशमुर्ती तयार करुन मुर्तीकलेचे अनोखे दर्शन घडविले. या उपक्रमासाठी वैष्णवी शेगावकर आणि सुधीर लांडगे यांचे मुलांना विशेष मार्गदर्शन लाभले. सदरील कार्यशाळेचे आयोजक उन्नती सोशल फाउंडेशनचे संचालक संजय भिसे , पिंपरी चिंचवड मनपाच्या प्रभागातील नगरसेविका डॉ. कुंदा भिसे तसेच उन्नती सखी मंचच्या उपाध्यक्षा डॉ. रश्मी मोरे, ऑल सिनियर सिटीझन असोसिएशनचे सचिव सखाराम ढाकणे, लिनियर गार्डन ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अशोक वारकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. लहान मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा यादृष्टीने गेल्या आठ वर्षांपासून हा उपक्रम राबविण्यात येत असून दरवर्षी याला लहान मुलांचा वाढता प्रतिसाद मिळत असल्याचे संजय भिसे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन बाळकृष्ण चौधरी यांनी केले. गणेशाच्या पारंपरिक आरतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# सिंथेटिक ट्रॅकच्या कामाची विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केली पाहणी

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज गारखेडा येथील विभागीय क्रीडा संकुलाची पाहणी करून सिंथेटिक ट्रॅकच्या कामाची माहिती घेतली. याच ठिकाणी १७ सप्टेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सिंथेटिक ट्रॅक तसेच महानगरपालिकेच्या सार्वजनिक बस सेवेतील नवीन बसेसचे लोकार्पण होणार असून, या कार्यक्रमाच्या तयारीचाही त्यांनी आढावा घेतला. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

कार्यक्रमासाठी मैदानातील बैठक व्यवस्था, विद्यार्थी व नागरिकांची उपस्थिती, पार्किंग, पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, प्रवेशद्वारे व बॅरिकेडिंगचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. सर्वसामान्य नागरिक व विद्यार्थ्यांसाठी मैदानात खुर्च्यांची व्यवस्था न करता अधिकाधिक नागरिकांना सामावून घेण्यासाठी खुली बैठक व्यवस्था करावी. व्हीआयपी मान्यवरांसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था ठेवावी, असे निर्देश त्यांनी दिले.



क्रीडा संकुल परिसरात ऑलिम्पियन व नामवंत खेळाडूंचे बॅनर्स तसेच मुख्यमंत्री यांच्या स्वागत व आभाराचे बॅनर्स लावण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. कार्यक्रमाची ध्वनिव्यवस्था उच्च दर्जाची व स्पष्ट असावी. तसेच गर्दीचे नियोजन करताना व्हीआयपी मान्यवर व सर्वसामान्य नागरिकांसाठी स्वतंत्र प्रवेश व्यवस्था ठेवावी, असेही त्यांनी निर्देशित केले. यावेळी जिल्हाधिकारी विनय गौडा, महापालिका आयुक्त अमोल येडगे, क्रीडा उपसंचालक शेखर पाटील तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# गणेशोत्सवात स्वच्छतेचा जागर; मनपातर्फे 'आमचा बाप्पा स्वच्छतेचा राजा' अभिनव स्पर्धा

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेतर्फे गणेशोत्सवानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन; यंदा स्पर्धेचे दुसरे वर्ष

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)-महाराष्ट्रातील गणेशोत्सवाला राज्योत्सवाचा दर्जा मिळाल्यानंतर छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेनेही गणेशोत्सव अभिनव पद्धतीने साजरा करण्याचे नियोजन केले आहे. गणेशोत्सवानिमित्त मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे गणेशोत्सवदरम्यान स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि कचरा व्यवस्थापनाशी संबंधित विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी सांगितले.

सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी मनपातर्फे 'आमचा बाप्पा स्वच्छतेचा राजा' या अभिनव स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेत सहभागी होणाऱ्या गणेश मंडळांना पर्यावरणपूरक गणेशमूर्ती, मुक्त मिरवणूक, कचरापेटीची सुविधा, इको फ्रेंडली सजावट यांसह विविध प्रश्न विचारले जातील. त्यातील निवडक मंडळांची निवड करून त्यांना प्रथम, द्वितीय तृतीय आणि ७ उत्तेजनार्थ बक्षिसे दिली जातील. मंडळांसाठी साऊंड सिस्टिम, सीसीटीव्ही कॅमेरा सेट, लाइट सेट यांसारखे बक्षिसे देऊन गौरविण्यात येणार आहे. यंदा या स्पर्धेचे दुसरे वर्ष असून गतवर्षी शहरातील तब्बल २५० गणेश मंडळांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी उत्कृष्ट दहा मंडळांचा विविध पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला होता. यंदाही शहरातील अधिकाधिक गणेश मंडळांनी या स्पर्धेत सहभागी होऊन स्वच्छ आणि पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा आदर्श निर्माण करावा, असे आवाहन मनपातर्फे करण्यात आले आहे.

गणेशोत्सवाच्या काळात दररोज सायंकाळी शहरातील प्रमुख गणेश मंडळांच्या ठिकाणी आशीर्वाद बाप्पाचा जागर स्वच्छतेचा या उपक्रमातर्गत *स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि कचरा वर्गीकरण* या विषयांवर जनजागृती करणारे पथनाट्य तसेच बँड सादरीकरण करण्यात येणार आहे.

गणेशोत्सव हा केवळ श्रद्धेचा उत्सव न राहता तो स्वच्छता, कचरा व्यवस्थापन आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा उत्सव ठरावा, हा या सर्व उपक्रमांचा मुख्य उद्देश आहे. 'आमचा बाप्पा स्वच्छतेचा राजा' या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी गणेश मंडळांना क्यूआर कोड स्कॅन करून ऑनलाइन सहभाग नोंदविता येणार आहे.

शहरातील सर्व गणेश मंडळांनी यावर्षीही मोठ्या संख्येने या स्पर्धेत सहभागी होऊन स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवावा, तसेच मनपाच्या सर्व उपक्रमांमध्ये नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन महापौर समीर राजूरकर, यांनी केले आहे.

# व्यंकटेश कुलकर्णी यांची कार्यकारी संचालक पदी नियुक्ती



पुणे दि.१२ (प्रतिनिधी)- सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्था मर्यादित या संस्थेची दिनांक ८ सप्टेंबर रोजी वार्षिक सर्वसाधारण सभा झाली. या सभेत व्यंकटेश कुलकर्णी यांची या संस्थेच्या कार्यकारी संचालक पदी नियुक्ती करण्यात आली. प्रस्तुत संस्था ही सहकार भारती संघटनेशी संलग्न असून नागरी सहकारी बँका, सहकारी पतसंस्था यांना प्रशिक्षण देण्याचे कार्य करीत आहे. संस्थेचे रजिस्टर ऑफिस पुणे येथे आहे. मागील वर्षात या संस्थेच्या माध्यमातून ५०० पेक्षा अधिक प्रशिक्षण वर्ग संपूर्ण महाराष्ट्रात घेण्यात आले. श्री व्यंकटेश कुलकर्णी हे बँकिंग तज्ञ आहेत. १९८९ पासून चिखली येथील दोन प्रथित यश अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटी ते चिखली अर्बन बँक, देवगिरी नागरी सहकारी बँक या बँकेत त्यांना वरिष्ठ पदावर काम करण्याचा प्रदीर्घ अनुभव आहे. दि खामगाव अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक या बँकेत एमडी आणि सीईओ या पदावर त्यांनी काम केलेले आहे. त्यांच्या निवडीबद्दल सहकार सुगंधचे संपादक भालचंद्र कुलकर्णी, डॉ. अभय मंडलिक, आणि अनेक नागरी सहकारी बँकेचे सीईओ, सहकारात काम करणाऱ्या पदाधिकारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# रोजगार महाकुंभ दि.२९ रोजी; जिल्ह्यात २१ ठिकाणी भरती मेळावे

छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- राज्यातील युवकांना रोजगार, स्वयंरोजगार, कौशल्य विकास आणि उद्योजकतेच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या वतीने ''रोजगार महाकुंभ महाराष्ट्र २०२६'' हा उपक्रम संपूर्ण राज्यात मंगळवार दि.२९ रोजी आयोजीत करण्यात आला आहे. या उपक्रमात अधिकाधिक युवक- युवतींनी सहभागी व्हावे,असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त.राजु वाकुडे यांनी केले आहे.

या उपक्रमांतर्गत राज्यभर एकाच दिवशी ८०० रोजगार मेळावे व प्लेसमेंट ड्राइव्ह आयोजित करण्यात येणार आहेत.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातही मंगळवार दि.२९ रोजी आसावा ब्रदर्स कॉमर्स कनिष्ठ महाविद्यालय व वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, सीएसएमएसएस छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, पैठण रोड, एमआयडीसी कौशल्य विकास केंद्र, शेंद्रा एमआयडीसी, सीएसएमएसएस पॉलिटेक्निक महाविद्यालय, पैठण रोड, सेतू चॅरिटेबल ट्रस्ट, भडकल गेट जवळ, देवगिरी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, रेल्वे स्टेशन रोड, कैलास शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खुलताबाद, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, विद्यापीठ परिसर याशिवाय जिल्ह्यातील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था जसे की गंगापूर, वैजापूर, कन्नड, फुलंब्री, सोयगाव आणि सिल्लोड अशा विविध २१ ठिकाणी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या रोजगार मेळाव्यात दहावी व बारावी उत्तीर्ण उमेदवार, कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवीधर व पदव्युत्तर उमेदवार, डिप्लोमा व अभियांत्रिकी पदवीधारक, अल्पमुदतीचे कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार, आयटीआय उत्तीर्ण तसेच अंतिम वर्षातील प्रशिक्षणार्थी आणि रोजगाराच्या शोधात असलेल्या पात्र युवक-युवतींना सहभागी होता येणार असून रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

रोजगार मेळाव्याची ठिकाणे, सहभागी आस्थापना, उपललब्धता, रिक्तपदे इत्यादी माहितीसाठी https://shorturl.at/hU4fh या लिंकद्वारे किंवा सोबत दिलेला क्यूआर कोड स्कॅन करावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त.राजु वाकुडे यांनी केले आहे.

# कुणबी जात प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिरात ६७ अर्ज प्राप्त



छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- जिल्ह्यात कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र वितरणासाठी आज आयोजीत ११ विशेष मंडळस्तरीय शिबिरांमध्ये एकूण ६७ अर्ज प्राप्त झाले असल्याची माहिती महसूल यंत्रणेने दिली आहे. आज जिल्ह्यात कांचनवाडी, शेकटा ता. छत्रपती संभाजीनगर, पैठण, पिंपळवाडी ता. पैठण, वेरुळ ता. खुलताबाद, हतनूर, चिकलठाण ता. कन्नड, हर्सूल, डोणगाव ता. गंगापूर, खंडाळा, बोरसर ता, वैजापूर अशा ११ ठिकाणीही शिबिरे झाली.

छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील शिबिरात ११, वैजापूर तालुक्यात १०, गंगापूर तालुक्यात ३, कन्नड तालुक्यात १९, खुलताबाद तालुक्यात २४असे एकूण ६७ अर्ज प्राप्त झाले. या प्रस्तावांची ऑनलाइन प्रक्रिया बाकी असून, तालुकास्तरीय वंशावळ समितीच्या बैठकीत निर्णय झाल्यानंतर तातडीने पुढील कार्यवाही करून अर्ज निकाली काढण्यात येणार आहे.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त मुख्यमंत्र्यांचे हस्ते विभागीय क्रीडा संकुल येथे विविध विकासकामांचे उद्घाटन व भूमिपूजन



छत्रपती संभाजीनगर दि.१२ (प्रतिनिधी)- मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या औचित्याने दि. १७ सप्टेंबर रोजी विभागीय क्रीडा संकुल येथे प्रस्तावित विविध विकास कामांचे उद्घाटन/भूमिपूजन पूर्वतयारीचा आज विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गौडा आणि छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी संयुक्त पाहणी करून आढावा घेतला.

या कार्यक्रमास राज्याचे मुख्यमंत्री मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते विविध विकासकामांचे उद्घाटन व भूमिपूजन करण्याचे नियोजन आहे. त्याअनुषंगाने विभागीय क्रीडा संकुल येथील कार्यक्रमस्थळाची पाहणी करून आवश्यक त्या सुविधा व व्यवस्थेबाबत अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.

कार्यक्रमासाठी स्टेडियम परिसरात किमान ५ हजार विद्यार्थी व विद्यार्थिनींची बैठक व्यवस्था करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना कार्यक्रमस्थळी ये-जा करताना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, तसेच कार्यक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

याशिवाय छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या विविध विकासकामांपैकी किमान दहा कामांचे उद्घाटन व भूमिपूजन मुख्यमंत्री यांच्या हस्ते करण्याचे प्राथमिक नियोजन करण्यात येणार आहे. संबंधित कामांची माहिती, कार्यक्रमाची रूपरेषा आणि आवश्यक नियोजन तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश यावेळी संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

कार्यक्रमस्थळी सुरक्षा, स्वच्छता, वाहतूक व्यवस्था, बैठक व्यवस्था, विद्युत व्यवस्था तसेच इतर आवश्यक बाबींचे काटेकोर नियोजन करण्याच्या सूचनाही अधिकाऱ्यांनी दिल्या.

यावेळी अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, शहर अभियंता संजय कोंबडे, अतिरिक्त शहर अभियंता अमोल कुलकर्णी, उपायुक्त अपर्णा थेटे, नंदकिशोर भोंबे यांच्यासह महानगरपालिका व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# सोनासिलेक्शन इंडिया लिमिटेडचा १७ सप्टेंबर २०२६ रोजी खुला होणार

मुंबई दि.१२ (प्रतिनिधी)- मूल्यवर्धित उत्पादनांच्या निर्मितीत कार्यरत असलेली एकात्मिक फॅब्रिक उत्पादन आणि प्रक्रिया कंपनी सोनासिलेक्शन इंडिया लिमिटेड ने आपल्या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरची घोषणा केली आहे. हा गुरुवार, १७ सप्टेंबर २०२६ रोजी खुला होईल आणि सोमवार, २१ सप्टेंबर २०२६ रोजी बंद होईल. अँकर गुंतवणूकदारांसाठी बोली/इश्यू कालावधी बुधवार, १६ सप्टेंबर २०२६ रोजी, म्हणजेच इश्यू खुला होण्याच्या एक कामकाजाच्या दिवसापूर्वी, खुला होईल.

या प्रारंभिक सार्वजनिक ऑफरमध्ये प्रत्येकी ₹१० दर्शनी मूल्य असलेल्या १४,३००,००० पर्यंत इक्विटी समभागांच्या नवीन निर्गमाचा समावेश आहे.

निव्वळ प्राप्तीचा वापर पुढील उद्दिष्टांसाठी प्रस्तावित आहे: कंपनीने बँकांकडून घेतलेल्या काही कर्जांची संपूर्ण किंवा अंशतः परतफेड आणि/किंवा आगाऊ परतफेड; राजस्थानमधील भिलवाडा येथील हमीरगड, चित्तोडगड रोड, १८वा के. एम. स्टोन, भिलवाडा ३११०२५ येथे असलेल्या विद्यमान उत्पादन प्रकल्पासाठी प्लांट आणि यंत्रसामग्री खरेदीच्या भांडवली खर्चासाठी निधी; आणि सर्वसाधारण कॉर्पोरेट उद्दिष्टे (एकत्रितपणे, ''उद्दिष्टे''). चॉइस कॅपिटल ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड ही इश्यूची बुक रनिंग लीड मॅनेजर असून केफिन टेक्नॉलॉजीज लिमिटेड ही इश्यूची रजिस्ट्रार आहे. इक्विटी समभाग बीएसई आणि एनएसईवर सूचीबद्ध करण्याचा प्रस्ताव आहे.

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**NOTICE INVITING e-TENDER**

| Sr. No. | Tender No. | Tender Details | Estimate Amount Rs. | EMD in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1. | 3000072065 | Administrative approval for "Comprehensive maintenance and operation of centralize AC plant, package units and ventilation system at Ghatghar HPS." | 77,55,057.48/- | 81,050.57/- |

**Tender Cost :** Rs. 1180.00
**Contact Person :** Superintending Engineer, RENEWABLE ENERGY CIRCLE, Ghatghar
Tel. No. 0253 2810185 / 2810485
For further details visit our Website : **https://eprocurement.mahagenco.in**
1. All interested vendors are requested to register to our website for e-tender : **https://eprocurement.mahagenco.in**
2. Actual quantum of work is to be accessed by the bidder before submitting the tender documents.

**Superintending Engineer, REC Ghatghar**